। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४९ वा । बुधवार दिनांक १७ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# अतिवृष्टीच्या जखमांवर मायेचा हात! धाराशिवच्या शेतकऱ्यांसाठी १०१ देशी गाई म्हणजे नवसंजीवनी !






धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात पुन्हा एकदा आशेचा प्रकाश झळकला आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने अनेक शेतकऱ्यांची शेती, उभी पिके आणि गोठ्यातील पशुधन अक्षरशः वाहून नेले. कष्टाच्या जीवावर उभे असलेले संसार एका क्षणात उद्ध्वस्त झाले. अशा वेळी केवळ मदतीचा शब्द नाही, तर कृतीतून आधार देणारे नेतृत्व म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री ना. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी संवेदनशीलतेचा जिवंत आदर्श घालून दिला आहे.

ग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेत, त्यांच्या स्वखर्चातून आणलेल्या १०१ उत्तम प्रतीच्या देशी 'गीर' गाईंचे वितरण काल रविवारी सायंकाळी ७ वाजता सद्गुरू सदानंद महाराज यांच्या शुभहस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन) पार पडले. हा उपक्रम म्हणजे केवळ मदत नाही, तर संकटात कोसळलेल्या शेतकरी कुटुंबांना पुन्हा उभे करण्याचा निर्धार ठरला आहे.

यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, अवकाळी पावसाच्या तडाख्याने धाराशिव जिल्ह्यातील अनेक शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाले. शेतीबरोबरच कुटुंबाच्या उपजीविकेचा मुख्य आधार असलेली दूधदुभती जनावरे गमावल्यामुळे त्यांचे जीवनचक्रच थांबले. ही व्यथा स्थानिक पत्रकारांनी माझ्यापर्यंत पोहोचवताच, क्षणाचाही विलंब न करता मदतीचा निर्णय घेतला. संपूर्ण देशभरातून उत्तम प्रतीच्या देशी गाईंचा शोध घेतल्यानंतर गुजरातमधील 'गीर' प्रजातीची गाय शेतकऱ्यांसाठी निवडली. प्रत्येकी सुमारे ७५ ते ८० हजार रुपये किंमतीच्या या गाई महाराष्ट्रातील स्थानिक गाईंपेक्षा दुप्पट दूध देतात. सध्या देशी दुधाला चांगला दर मिळत असल्याने, या माध्यमातून शेतकऱ्यांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळेल आणि त्यांच्या कुटुंबाला भक्कम आर्थिक आधार प्राप्त होईल.

विशेषतः कळंब, भूम आणि परंडा⁎ तालुक्यांमध्ये अतिवृष्टीचा फटका अधिक बसल्याने, या भागातील पशुधन गमावलेल्या शेतकरी कुटुंबांना स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळावा, या उदात्त हेतूने हे गाईंचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम म्हणजे केवळ जनावरांचे वाटप नाही, तर संकटाच्या काळातही शासन आणि लोकप्रतिनिधी आपल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, याची साक्ष देणारी मायेची हमी आहे.

दूधाळ गाईंसोबतच शेतकऱ्यांच्या जीवनात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि नव्या आशेचे दूध पुन्हा वाहू लागले आहे

## क्राईम न्युज

### एक लाखाच्या दोन म्हैसची अज्ञाताने केली चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गणेश बाळू गुंड, वय २३ वर्षे, रा.सुरतगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची एक म्हैस व अभिजीत युवराज खोपडे, यांची अंदाजे ६०,००० किंमतीची एक म्हैस या दि.१२.१२.२०२५ रोजी २०.०० ते दि. १३.१२.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. सुरतगाव शिवारातील शेतातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गणेश गुंड यांनी दि.१५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लोहगाव शिवारातून म्हैस चोरली: गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामदेव मधुकर येडगे, वय २५ वर्षे, रा.लोहगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ८०,००० किंमतीची एक म्हैस ही दि.२२.११.२०२५ रोजी संजय शिवाजीराव मोरे यांचे लोहगाव शिवारातील शेतातील गोठ्यातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नामदेव येडगे यांनी दि.१५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देणाऱ्यावर गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, विजयसिंह थोरात, यशवंत धनाजी थोरात, रा. भुम, बालाजी लाला काळे, रा. हिवरा, निलेश गुळमे, रा. भुम रावजी उर्फ पल्या काळे रा. कल्याणनगर भुम, शंकर राजु काळे, रा. ढोकी, विलास भारती रा.भुम, विलास लोढें रा.भुम, ओंकार होळकर, रा. भुम गुड्डू गाडे, रा. भुम सुनिल माळी, जावेद शेख, स्वप्निल उर्फ पिट्या हावळे, सर्व रा. भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी आरसोली शेत शिवार कुरणात खडी क्रेशर मशीनचे बाजूस मोकळ्या मैदनावर भुम येथे रेड्यांच्या टकरी न घेण्याबाबत कलम १६८ भान्या.सं. नुसार आगावू सुचना देवुनही त्यांनी नोटीस घेण्यास नकार देवून पाळीव प्राणी दोन रेड्यां मध्ये पैजेसाठी व मंनोरजनासाठी रेड्यांचे टकरीचे/ झुंजीचे आयोजन करुन रेड्यांच्या टकरी घडवून आणून रेडे ऐकमेकांच्या टकरीत व झुंजीत जखमी झाल्याने तसेच टकरीतील झुंजीतील रेडे उधळुन पळाल्याने तेथील लोखंचे जिवीतास धोका उत्पन्ना केला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यांना निर्दयपणे वागणूक कायदा कलम ११ (१) (ए), ११ (१)(एम), ११(१)(एन) सह भा.न्या. सं. कलम- १२५, २९१ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी तात्काळ लागू करा - खासदार ओमराजे निंबाळकर




नवी दिल्ली (प्रतिनिधी)- महाराष्ट्र -देशातील शेतकरी आज गंभीर आर्थिक संकटात सापडलेला असताना, त्यांच्या हक्कांसाठी निर्णायक पावले उचलण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आज लोकसभेत पुरवणी मागण्यांच्या चर्चेदरम्यान स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी तात्काळ आणि संपूर्णपणे अंमलात आणण्याची ठाम मागणी केली.

खासदार निंबाळकर म्हणाले की, उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा देणारी हमीभाव (चड्झ) व्यवस्था शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरेल. वाढती महागाई, खत-बियाण्यांचे दर, मजुरी खर्च आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी अक्षरशः अडचणीत सापडला असून, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, सरकारकडून केवळ घोषणा न करता ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. शेती टिकवायची असेल तर शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य दर, कर्जमाफी, सिंचन सुविधा आणि बाजारपेठेतील संरक्षण मिळाले पाहिजे.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्र सरकारला स्पष्ट शब्दांत सांगितले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर सामाजिक आणि आर्थिक परिणाम देशाला भोगावे लागतील. त्यामुळे स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

# श्री तुळजाभवानी देवींची सिंहासन पूजा जानेवारी २०२६ ची ऑनलाईन नोंदणी सुरु



धाराशिव (जिमाका) -महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची जानेवारी - २०२६ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी. असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक,तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूरला येतात. श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून,नोंदणीसाठी http://shrituljabhavani.org या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर जाऊन नोंदणी करावी.

नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. नोंदणी कालावधी : २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता ते २५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत.प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट : २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.भाविकांनी प्रथम फेरीचे ऑनलाईन पेमेंट २७ डिसेंबर सकाळी ११ ते २८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे.

सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता एसएमएस पाठविण्यात येईल. व्दितीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २८ डिसेंबर सकाळी ११ ते २९ डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.

प्रथम व द्वितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजतापर्यंत पाठविण्यात येईल.तृतीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ३० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.जानेवारी २०२६ या महिन्यातील अंतीम सिंहासन पूजा बुकींग झाल्याची यादी ३० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रसिद्ध करण्यात येईल.

वरीलप्रमाणे सर्व भाविक भक्त,महंत, पुजारी,सेवेकरी आणि नागरिकांनी वरीलप्रमाणे सिंहासन पूजेच्या नोंदणीची माहिती लक्षात घेऊन वेळेत नोंदणी करावी,

तसेच १ जानेवारी ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत तिन्ही पुजारी मंडळ यांचेसाठी सिंहासन पूजा आरक्षित असल्याने या कालावधीत सिंहासन पूजा होणार नाही. याची भाविकांनी नोंद घ्यावी.असे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी कळविले आहे.

# संविधान अमृत महोत्सवानिमित्त 'भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५' उपक्रम; विद्यार्थ्यांसाठी नोंदणी सुरू

धाराशिव (जिमाका) भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने राज्यात संविधान अमृत महोत्सवी जागृती अभियानांतर्गत भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाबाबतच्या सविस्तर सूचना शासनस्तरावरून देण्यात आल्या आहेत.या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली १२ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन,नागपूर येथे बैठक पार पडली.

भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी www.yuvacareer.com ही वेबसाईट सुरू करण्यात आली आहे. या वेबसाईटवर अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवायचा आहे.यामध्ये विविध प्रशिक्षण संस्था,अधीक्षक वसतिगृहे, तंत्रनिकेतन,अल्पसंख्याक शाळा, मदरसे इत्यादींचा समावेश आहे.

या पोर्टलवर दिनांक १०.१२.२०२५ पासून नोंदणी सुरू असून,दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत विद्यार्थ्यांना नोंदणी करता येणार आहे.

www.yuvacareer.com या वेबसाईटवर नोंदणी केल्यानंतर त्याचा अहवाल जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

## जाळुन केले नुकसान

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत हासेगाव शि. ग्रामपंचायत कार्यालय येथे अज्ञात व्यक्तीने एका लाकडी काठीला कपडा गुंडाळून ग्रामपंचायत कार्यालयाचे पाठीमागील खिडकीच्या समोरील उघडे कपाटातील शासकीय दस्ताऐवज आग लावून जाळुन नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी राजेंद्र धोडींराम राठोड, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी ग्रामपंचायत अधिकारी रा. नांदुर्गा ता. औसा जि. लातुर ह.मु. श्रीनगर लातुर यांनी दि.१५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे शिराढोण येथे गुन्हा नोंदवला आहे.

# प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून बांधून ठेवणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अकीब महमद अली कुरेशी, रा. कुरेशी गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१५.१२.२०२५ रोजी १३.३० वा. सु.शेत गट नं २०६ चे बांधावर जामगाव ते परंडा रोडचे कडेला गोवंशीय जातीचे ७ वासरे एकुण ४९,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे वासरे आकुड दारीने बांधून ठेवून चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने बांधून ठेवून कत्तलीसाठी घेवून जात असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१),११(१)(ए),११ (१) (एफ), ११(१)(एच), ११(१) (आय) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महानगरपालिकेच्या निवडणुका लागल्या

राज्यात प्रदिर्घ काळानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका कार्यक्रम जाहिर झाला आहे. लातूर महानगरपालिकेची जवळपास साडे नऊ वर्षानंतर निवडणुका होताना दिसून येत आहेत. सध्याला नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुक प्रक्रिया चालू आहे. त्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणे बाकी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका वेळेवर होणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या ग्रामीण भागातील महत्वपुर्ण असतात. जर याच निवडणुकीस विलंब होत असेल तर यातील त्रुटी शोधणे आवश्यक आहे. राज्यात राजकिय स्थिती विचित्र आहे. तीन-तीन पक्ष मिळून कार्यरत आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सामाऊन घेणें आवघड आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत अजून एकी होण्याचे बाकी आहे. जसे उद्धव ठाकरे व राज ठाकरे हे एकत्र येणे बाकी आहे. महायुतीत युती होत नाही. मोठ्या शहरात जसे पुण्यात अजित पवार यांची राष्ट्रवादी स्वतंत्र तर एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस या दोघात युती झाल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे बाकीच्या ठिकाणी तर स्वबळावर लढावे असा कार्यकर्त्याचा नारा दिसून येत आहे. राजकारणात तेही निवडणुकीच्या काळात कोण कोणासाठी प्रामाणिक राहील हे सांगता येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत फारसा पक्ष पाहिला जात नाही. व्यक्तीकडे पाहिले जाते. आपल्या संपर्कात असणाऱ्यास नगरसेवक म्हणून निवडले जाते. हा अनुभव पाहाता काही अतिउत्साही पक्ष कार्यालयात तिकीटासाठी चकरा मारत आहेत. दरवर्षी काँग्रेसकडे उमेदवारी मागणाऱ्याची संख्या अधिक असते आता भाजपाचे सरकार राज्यात व केंद्रात असल्याने भाजपाच्याही कार्यालयात गर्दी दिसून येत आहे. मोठ्या शहरात भाजपाचे कार्यालयात गर्दी पाहून समाधान वाटत असले तरी स्थानिक स्तरावरील प्रश्नाची सोडवणुक कराणाराच्या उमेदवारांस पसंती मतदार करणार आहेत हे नक्की!. राज्यात पुणे, छत्रपतीसंभाजीनगर, लातूर तसेच मुंबई-ठाणे महानगरपालिकेत उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. येथे उमेदवारी मागणाऱ्याची संख्या अधिक दिसून येत आहे. राजकारणात ज्याची सत्ता असते त्याकडे झुकलेली जनता असते. राज्यात व केंद्रात भाजपाची सत्ता आहे. राज्यात तीन पक्षाचे सरकार असले तरी मुख्यमंत्री हा भाजपाचे आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी महायुती व्हावी अशी अपेक्षा नेत्याची आहे. स्थानिक स्तरावरील कार्यकर्त्यांचे विचार न एकता जर निर्णय घेतले तर यश मिळण्यात आवघड होते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्थानिक कार्यकर्त्याचे ऐकून घ्यावे लागते. नगर परिषदेचा निकाल लागणे बाकी आहे. अचानक काही ठिकाणाच्या निवडणुका लांबविल्याने मतदारात मोठी नारजकी दिसून येत आहे. अचानक निवडणुका लांबविणे तसे योग्य नाही. वास्तविक निवडणुक अशी प्रक्रिया आहे की, जनतेचा सहभाग स्वयंस्पुर्तीने असला पाहिजे. यावर विरजण टाकले तर निकालावर परिणाम होतो. येणारी जागा जाते व जाणारी येते हा धोका दिसून येतो. त्यामुळे विशेष करून सत्ताधाऱ्यांनी सावध चालले पाहिजे. एकही कार्यकर्ता नाराज होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. राज्यातील ह्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका महत्वाच्या आहेत, कारण ग्रामीण भागातील मंडळी कोणाच्या बाजूने आहे हे कळून येते. शहरी भाग व ग्रामीण भागावर विधानसभेच्या निवडणुकीचा अंदाज येऊ शकतो. जनता राज्य कारभारावर नाराज आहे का आनंदी आहे हे पक्के कळण्याचा हा मार्ग स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ह्या आहेत. त्यामुळे सध्या चालू असणारी निवडणुक प्रक्रिया महत्वाची आहे. पुर्वी पेक्षा आता बदल आहे. एका प्रभाग तिघांचा समावेश आहे. त्यामुळे काम न झाल्यास कोणाला जबाबदार धरावे हा प्रश्न त्या भागातील नागरिकांना पडतो. आता ज्या निवडणुका जाहिर झाल्या त्या शहरातील आहेत. शहरातील मतदार बोलत नाही मात्र आपल्या मनात जे आहे तेच करीत असतो. ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. राज्यातील सर्वात महत्वाची महानगरपालिकेची निवडणुक ही मुंबई महानगरपालिकेची आहे. देशातील ज्या काही आर्थिक राजधान्या आहेत त्या पैकी मुंबई आहे. मोठी आर्थिक उलाढाल या शहरात होते. त्यामुळे मुंबई महानगरपालिका भाजपाला स्वबळावर घेण्याचा प्रयत्न राहणार आहे. शिवसेनेकडे दिर्घकाळ असणारी ही महानगरपाहिलका भाजपाकडे खेचण्याचा प्रयत्न आहे. मुंबई मराठी माणसाची आहे. ती कायम राहणार आहे. शिवसेनेमुळे मराठी माणसाचे वर्चस्व आहे. पंचवीस वर्ष भाजपा व शिवसेनेची युती होती. दोघांनी मिळून सत्ता चालविली. कालांतराने हिंदुहृद्यसम्राट बाळासाहेबांचे निधन झाले. त्यामुळे दोघातील युती तुटली. शिवसेनेतून मातब्बर मंडळी बाहेर पडली. त्यात राज ठाकरे वेगळे झाले हा सर्वात मोठा आंतर पडल्याचे दिसून आले. आज उद्धव ठाकरे यांना राज ठाकरे सोबत यावे असे वाटत असले तरी राज ठाकरे यांनी भोगलेला राजकिय सन्यासचा विसरला जाऊ शकत नाही. त्यामुळे अजून तरी राज व उद्धव एकत्र झाल्याचे जाहिर होवू शकले नाही. राज ठाकरे जर उद्धव ठाकरे सोबत मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत उतरले तर ही मुंबई महानगरपालिकेची निवडणुक भाजपासाठी कठिण जाण्याची शक्यता आहे. तरी मुख्यमंत्री सह भाजपाचे वरिष्ठ मंडळी अनेक वर्षापासून मुंबईमहानगर पालिका आपल्याच ताब्यात राहाण्यासाठी प्रयत्नात आहे. आतातर राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर झाल्या आहे. त्यापुर्वी नगरपरिषदेचा निकाल हाती येणार आहे. याचा निकाल कसा लागतो यावर बरेच आवलंबुन आहे. मुळात आपल्या राज्यात कधी होणार महानगरपालिकेची निवडणुक याकडे अनेक वर्ष वाट पाहाणाऱ्यास दिलासा मिळाला आहे. अनेक कधी न दिसणारे भावी नगरसेवक हात जोडून बळजबरीने नमस्कार घालत आहेत. काही झाले तरी शहरी मतदार हा विचारपुर्वक मतदान करणारा आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

# वाढली थंडी, घ्या तब्बेतीची काळजी..!



राज्यात सध्या दिवसेंदिवस तापमानाचा पारा चांगलाच खाली येताना दिसत आहे. त्यामुळे राज्यात सर्वदूर थंडी वाढल्याचे चित्र आहे. उत्तरेकडे थंड वाऱ्याचा जोर वाढल्याने राज्यात कडाक्याची थंडी पडली असून लातूर जिल्ह्यात देखील कडाक्याची थंडी अनुभवायला मिळत आहे. उत्तरेकडील वाढत्या शीत लहरींमुळे राज्यात पुढील काही दिवस कडाक्याची थंडी राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



दरम्यान, थंडीची लाट किंवा शीत लहर ही एक हवामानीय घटना आहे, ज्यामुळे विशिष्ट क्षेत्रातील तापमान सरासरीपेक्षा खूप कमी होते. थंडीच्या लाटेमुळे उच्च वेगाच्या थंड वाऱ्यांचा अनुभव येतो, ज्यामुळे हवामान प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा जास्त थंड वाटते. ही घटना अचानक घडू शकते किंवा काही दिवसांपर्यंत टिकू शकते, ज्यामुळे मानवी जीवन, शेती, पशुधन, वन्यजीव प्रभावित होण्याची शक्यता असते.

वाढत्या शीत लहरीमुळे शरीराच्या तापमानावर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे शारीरिक समस्या उद्भवू शकतात विशेषतः आरोग्याच्या दृष्टीने अति जोखीम घटक जसे की, गरोदर महिला, लहान बालके, वयोवृद्ध नागरिक, श्वसनाच्या आजारांच्या व्यक्ती हे अधिक प्रभावित होण्याची शक्यता असते.

या अनुषंगाने, जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना त्यांच्या संबंधीत कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे बाबतच्या मार्गदर्शक सूचना जिल्हास्तरावरून देण्यात आलेल्या असून वाढत्या थंडीपासून नागरिकांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी, सुरक्षित रहाण्यासाठी पुढील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

**वाढत्या थंडीत घ्यावयाची काळजी**

पुरेसे थंडीचे कपडे बाळगा, एकावर एक असे अनेक कपडे घालणेही उपयुक्त.

कोरडे राहा, ओले असाल तर कपडे पटकन बदला ज्याद्वारे शरीरातील उष्णता कमी होणार नाही.

हातमोज्यांपेक्षा पूर्ण हात सलगपणे झाकला जाईल असे मोजे घ्या, त्यानं जास्ती गरम वाटून थंडीपासून बचाव होतो.

लाट आली असताना शक्यतो घरातच थांबा, थंड वाऱ्यापासून बचावासाठी किमान प्रवास करा.

घरातल्या वृद्धांची आणि लहान मुलाची काळजी घ्या.

रेडीओ, टीव्ही तसंच वृत्तपत्रातून हवामानविषयक ताज्या बातम्या मिळवा.

नियमितपणे गरम पेय प्या.

मद्यपान करू नका, त्यानं शरीराचं तापमान कमी होतं.

थंडीने शरीराचा भाग मऊ वा मलूल होणं, बोटांवर तसेच पायाच्या टोकाला, कानाच्या पाळीला आणि नाकाच्या शेंड्यावर निस्तेजपणा, पांढरटपणा किंवा पिवळेपणा जाणवणे यासारख्या लक्षणांकडे लक्ष द्या.

थंडीचा चटका बसून भाजल्यासारखं झालं तर चोळू नका, त्यानं जास्तीच हानी होईल.

थंडीचा चटका बसलेला शरीराचा भाग गरम पाण्यात म्हणजे सहन होईल इतपत गरम पाण्यात बुडवावा.

थंडीनं कापत असाल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे शरीराचे तापमान कमी होत असल्याचे पहिले लक्षण आहे आणि लगेचच घरात या.

थेट शरीराशी संपर्क होईल अशा पद्धतीने थंडी कमी करा, त्यात घोंगड्याचा थर, कपडे, टॉवेल किंवा काहीही आच्छादनाचा थर वापरा.

थंडीमुळे कोणताही प्रकारची आरोग्य समस्या उद्भवल्यास नजीकच्या शासकीय दवाखान्यात जाऊन तपासणी करा.

**अशा प्रकारे, वाढत्या थंडीत जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी, सुरक्षित रहाण्यासाठी उपरोक्त प्रमाणे आपली व आपल्या कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरूरे यांनी केले आहे.**

# महागड्या केमिकलयुक्त शॅम्पूने केस गळतात? मग केसांच्या वाढीसाठी असा करा रीठाचा वापर

बहुतेक व्यावसायिक शॅम्पूमध्ये रासायनिक फोमिंग एजंट असतात जे त्वरित फेस तयार करतात. केस कमकुवत होतात.

आजकाल केसांच्या समस्या प्रचंड वाढत आहेत. केस निरोगी ठेवण्यासाठी अनेकजण परत एकदा आयुर्वेदिक उपायांकडे वळत आहेत. त्यातीलच एक म्हणजे रीठाचा वापर होय. रीठा, ज्याला सोपनट म्हणूनही ओळखले जाते.ही एक वनस्पती आहे ज्यामध्ये नैसर्गिक सॅपोनिन असतात. जे पाण्यात मिसळल्यावर फेस तयार करतात. हे सॅपोनिन केस आणि टाळूवरील घाण कोणतेही नुकसान न करता साफ करते.

महत्वाचे म्हणजे, त्यात कोणतेही रसायने, सल्फेट्स किंवा पॅराबेन्स नसतात. ज्यामुळे ते संवेदनशील टाळू असलेल्यांसाठी देखील सुरक्षित असते. रीठा केसांमध्ये नैसर्गिक ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करते. कोरडेपणा टाळते.

केसांची मुळे मजबूत होतात-

रीठाचा नियमित वापर केसांची मुळे मजबूत करतो. रासायनिक शॅम्पू टाळू कोरडे करतात.तर रीठाचा शॅम्पू नैसर्गिक संतुलन राखतो. यामुळे हळूहळू कोंडा कमी होतो. रीठाने केस धुण्याने खाज सुटणे, कोंडा होणे आणि जास्त केस गळणे यापासून आराम मिळतो. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून रीठ केसांसाठी देखील फायदेशीर मानले जाते,



कारण ते टाळू स्वच्छ ठेवून नवीन केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते.

रीठापासून बनवा शॅम्पू

रीठापासून शॅम्पू बनवणे खूप सोपे आहे. ४-५ वाळलेल्या रिठाचे तुकडे रात्रभर पाण्यात भिजवा किंवा १०-१५ मिनिटे उकळवा. उकळल्यानंतर, पाणी फेस तयार करेल. हे फेसयुक्त पाणी थंड करून थेट केसांना लावता येते. केसांच्या लांबीनुसार त्याचे प्रमाण वाढवता येते. ग्रामीण भागात, महिला आठवड्यातून एक किंवा दोनदा या पाण्याने केस धुतात. ही पूर्णपणे मोफत आणि नैसर्गिक पद्धत आहे.

बहुतेक व्यावसायिक शॅम्पूमध्ये रासायनिक फोमिंग एजंट असतात जे त्वरित फेस तयार करतात. परंतु दीर्घकाळात केस कमकुवत करू शकतात. याउलट, रीठा हळूहळू काम करते परंतु केसांच्या आरोग्याला हानी पोहोचवत नाही. फेस नसल्यामुळे सुरुवातीला लोक गोंधळात पडू शकतात, परंतु हीच त्याची अद्वितीय क्षमता आहे. ते केस न गळू देता टाळू स्वच्छ करते, केसांची नैसर्गिक ताकद राखते.

रीठा केवळ केसांसाठीच नाही तर पर्यावरणासाठी देखील सुरक्षित आहे. ते पूर्णपणे जैवविघटनशील आहे आणि पाणी प्रदूषित करत नाही. यामुळे लोकांना महागडे शॅम्पू खरेदी करण्याची गरज देखील कमी होते. ज्यामुळे त्यांचा मासिक खर्च वाचतो. ग्रामीण, डोंगराळ भागात रीठा सहज उपलब्ध होते. आजकाल शहरांच्या बाजारांमध्येही रीठा सहज मिळते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२५ च्या दुसऱ्या पेन्शन अदालतचा यशस्वी समारोप
# ९६ तक्रारींचे जागेवरच निराकरण केले

**सोलापूर/प्रतिनिधी :**मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १५ डिसेंबर २०२५ रोजी भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाच्या अंतर्गत सुशासन उपक्रमाचा भाग म्हणून सोलापूर येथील विभागीय रेल्वे कार्यालयात पेन्शन अदालतचे यशस्वीरित्या आयोजन केले. सरकारी मार्गदर्शक तत्त्वांनुसार निवृत्त रेल्वे कर्मचारी आणि कुटुंब पेन्शनधारकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

पेन्शन अदालतने समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ म्हणून काम केले. यावेळी निवृत्त कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, निवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा उत्साही सहभाग दिसून आला, जो रेल्वेच्या तक्रार निवारण यंत्रणेवरील विश्वास आणि विश्वास दर्शवितो. कार्यक्रमादरम्यान, पेन्शन अदालतचे प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा म्हणून महत्त्व स्पष्ट करण्यात आले आणि पेन्शनशी संबंधित समस्यांचे जलद निवारण करण्यासाठी रेल्वेने अवलंबलेल्या कार्यपद्धतींची रूपरेषा सांगण्यात आली. सोलापूर विभागाने पारदर्शकता, जबाबदारी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांप्रती संवेदनशीलता




यावर सतत लक्ष केंद्रित करत मार्गदर्शन केले.

पेन्शन आणि पगाराशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी कार्मिक आणि लेखा विभागातील अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे प्रकरणांची जलद पडताळणी आणि निपटारा सुनिश्चित झाला, ज्यामुळे पेन्शनधारकांची गैरसोय कमी झाली. निवृत्त कर्मचारी आणि कुटुंब पेन्शनधारकांकडून प्राप्त झालेल्या एकूण ११७ तक्रारींपैकी प्रभावी ९६ तक्रारींचे निवारण जागेवरच करण्यात आले. एनईएफटीद्वारे ७,८१,०९७/- (रुपये सात लाख एक्याऐंशी हजार सत्याणव फक्त) रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात त्वरित वितरित करण्यात आली, ज्यामुळे तात्काळ आर्थिक मदत मिळाली.

पेन्शन अदालत २०२५ चे यशस्वी आयोजन कार्मिक आणि लेखा विभागातील सेटलमेंट विभाग, कल्याण कर्मचारी आणि सहाय्यक अधिकारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाले, ज्यांच्या समर्पित कार्यामुळे सुरळीत संघटना आणि प्रभावी निकाल सुनिश्चित झाले. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग अशा सक्रिय उपक्रमांद्वारे त्यांच्या तक्रार निवारण प्रणाली मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे कल्याण, प्रतिष्ठा आणि आर्थिक सुरक्षितता राखण्यासाठी वचनबद्ध आहे.

# फसवणूक करणारे तुमच्या पॅन कार्डमधून घालू शकतात लाखोंचा गंडा, त्याचा कसा दुरुपयोग होत आहे ते अशाप्रकारे तपासा

आजच्या काळात पॅन कार्ड हे एक महत्त्वाचे दस्तावेज बनले आहे. आयकर रिटर्न भरणे, बँक खाते उघडणे, आर्थिक व्यवहार इत्यादी कामांसाठी याचा वापर केला जातो. ओळख (आयडी) पुरावा म्हणून अनेक सरकारी कामे पॅनकार्डने केली जातात. त्यात मिळणाऱ्या सुविधांमुळे सायबर घोटाळेबाजांची फसवणूक करण्याचा नवा डावही बनला आहे. जर एखाद्याचे पॅनकार्ड हातात आले, तर ओळख चोरीबरोबरच बँक खातेही पुसले जाऊ शकते.

सायबर गुन्हेगार तुमच्या पॅन कार्डचा गैरवापर करून लाखो रुपयांची चोरी करू शकतात. याशिवाय ते तुमच्या नावावर कर्जही घेऊ शकतात आणि तुम्हाला कळणारही नाही. त्यामुळे पॅनकार्ड सुरक्षित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. तुम्ही जराही हलगर्जीपणा दाखवलात, तर तुम्ही तुमचे कष्टाचे पैसे गमावू शकता.

**पॅन कार्डद्वारे फसवणूक करण्याचे मार्ग**

**बनावट कर्ज आणि क्रेडिट कार्ड:** फसवणूक करणारे तुमचे पॅन कार्ड वापरून बनावट कर्ज घेऊ शकतात किंवा क्रेडिट कार्ड बनवू शकतात. याचा तुमच्या क्रेडिट स्कोअरवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो आणि तुम्हाला भविष्यात कर्ज मिळण्यात अडचणी येऊ शकतात.

**बनावट बँक खाते:** सायबर गुन्हेगार तुमचे पॅन कार्ड वापरून बनावट बँक खाते उघडू शकतात. याचा वापर करून ते फसवणूक करू शकतात आणि अवैध व्यवहार करू शकतात.

**फिशिंग स्कॅम:** सायबर हॅकर्स तुमचे पॅन कार्ड तपशील वापरून तुम्हाला धोकादायक एसएमएस पाठवू शकतात. अशा प्रकारे ते तुमचे बँक खाते पुसून टाकू शकतात किंवा तुमच्या फोनवरून वैयक्तिक डेटा चोरू शकतात.

**पॅन कार्डचा गैरवापर रोखण्याची पद्धत**

तुमच्या पॅनकार्डचा कोणी गैरवापर करत असल्याचा तुम्हाला संशय असल्यास, हा गैरवापर तपासता येईल. फक्त या चरणांचे अनुसरण करा.

क्रेडिट स्कोअर रेटिंग वेबसाइटला भेट द्या.

येथे पॅन कार्ड तपशीलांद्वारे तुमचा क्रेडिट स्कोअर तपासा.

तुमच्या नकळत तुमचे पॅन कार्ड कुठे वापरले गेले आहे, हे या वेबसाइट्सवरून तुम्हाला कळेल.

याशिवाय कमी क्रेडिट स्कोअर हा देखील गैरवापराचा मोठा इशारा आहे.

**पॅन कार्डच्या गैरवापराची तक्रार कशी करावी**

तुमच्या पॅनकार्डचा कोणी गैरवापर केला असेल तर अशा प्रकारे तक्रार करा-

सायबर क्राईम पोर्टलवर पॅन कार्डच्या गैरवापराबद्दल तक्रार दाखल करा.

याशिवाय तुम्ही स्थानिक पोलिसांकडे जाऊन तक्रारही करू शकता.

तुम्हाला पॅन कार्डशी संबंधित काही समस्या असल्यास, इन्कम टॅक्स इंडियाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

येथे तळाशी जा आणि तक्रार विभाग उघडा.

तुमची तक्रार लिहा आणि फॉर्म सबमिट करा.

अशा प्रकारे तुमची तक्रार आयकर विभागाकडे जाईल. पॅन कार्डचा गैरवापर टाळण्यासाठी तुम्हाला नेहमी सतर्क राहण्याची गरज आहे. तुम्हाला पॅन तपशील ऑनलाइन एंटर करायचे असल्यास, वेबसाइटची URL 'https' ने सुरू झाली पाहिजे हे तपासा.

# मुलाखतीला जाण्यापूर्वी तुमच्या व्यक्तिमत्त्वात हे बदल करा, वाढेल तुमची निवड होण्याची शक्यता



आजकाल नोकरी शोधणे, हे आव्हानापेक्षा कमी नाही. त्यासाठी आधी मुलाखत उत्तीर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. अशा परिस्थितीत लोक यासाठी पूर्ण तयारी करतात. जर ५ लोक मुलाखतीसाठी गेले असतील आणि त्या सर्वांनी सम ान अभ्यास केला असेल. मात्र त्यानंतरही ५ पैकी फक्त १ निवडला जातो. अशा स्थितीत बरोबर उत्तर दिल्यानंतरही काय चुकते असा प्रश्न काहींना पडत असेल.

मुलाखतीदरम्यान केवळ तुमच्या ज्ञानाकडेच नाही, तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाकडेही लक्ष दिले जाते. ज्यामध्ये तुमची बसण्याची पद्धत, ड्रेसिंग सेन्स, बोलण्याची पद्धत सर्व लक्षात येते. अशा परिस्थितीत मुलाखतीला जाताना तुम्ही तुमच्या व्यक्तिमत्त्वाकडेही लक्ष दिले पाहिजे.

जेव्हाही आपण एखाद्याला पहिल्यांदा भेटतो, तेव्हा आपण सर्वप्रथम त्याच्यातिच्या लुककडे पाहतो, म्हणजे त्याचा ड्रेसिंग सेन्स. अशा परिस्थितीत तुम्ही ज्या ठिकाणी मुलाखतीला जाणार आहात त्यानुसार तुम्ही कपडे घालणे फार महत्वाचे आहे. मुलाखतीत फॉर्मल ड्रेस घालण्याचा प्रयत्न करा. तसेच चेहऱ्यावर हास्य ठेवा.

आपण कसे तरी समोरच्या व्यक्तीशी बोलतो. त्याचा खूप प्रभाव पडतो. त्यामुळे मुलाखतीदरम्यान कोणताही प्रश्न आधी नीट ऐका आणि समजून घ्या आणि नीट विचार करूनच योग्य उत्तर द्या. या काळात अजिबात संकोच करू नका तर पूर्ण आत्मविश्वासाने तुमचा मुद्दा मांडा. यावेळी तुमच्या देहबोलीकडेही लक्ष द्या. तुमचा मुद्दा मांडण्यासाठी योग्य शब्द निवडणे देखील खूप म हत्वाचे आहे. कारण या सर्व गोष्टी मुलाखतीदरम्यानही लक्षात येतात. तुमचे बोलणे समोरच्या व्यक्तीला हे पटवून देऊ शकते की तुम्ही या कामासाठी योग्य आहात.

मुलाखतीदरम्यान नर्व्हस होणे स्वाभाविक आहे. पण तरीही तुम्ही तुमची देहबोली आणि चेहऱ्यावरचे हावभाव असे ठेवावेत की समोरची व्यक्ती तुमच्या अस्वस्थतेचा अंदाज लावू शकणार नाही. अशा परिस्थितीत, लक्षात ठेवा की तुम्ही तुमची पाठ सरळ करून बसा आणि मुलाखतकाराशी संपर्क साधा. तसेच, त्यांच्या सर्व प्रश्नांची मुद्द्याला उत्तरे द्या आणि तुम्ही तुमच्या नोकरीबद्दल उत्सुक आहात असे नक्कीच वाटले पाहिजे. तुमच्यासोबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.

मानसिकता विषारी करून धर्माच्या नावावर विद्वेष निर्माण करणार्यांना वेसण घालणे पुरेसे नाही, त्यांना कठोर शिक्षा करून तरुण पिढ्या नष्ट करण्याचा उद्योग बंद करावा लागेल. यामध्ये रोजच्या विवंचनांशी झगडत जीवन जगणारे भरडले गेल्यास सूडचक्र थांबण्याची आशा मावळेल.

ऑस्ट्रेलियात दहशतवादी पिता-पुत्रांनी ज्यू धर्मीय नागरिकांचे हत्याकांड घडविले. मानवी संस्कृतीसमोर दहशतवादी मानसिकतेमुळे केवढे मोठे आव्हान उभे राहिले आहे, हे यावरून लक्षात येईल. ऑस्ट्रेलियातील हत्याकांडाचे दोघे कर्ते करविते पाकिस्तानी आहेत, याबद्दल अजिबात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही! सीरियात अमेरिकन सैनिकांवर आयसिसने हल्ला केल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांचा संताप होतो आणि पहलगाम हत्याकांडानंतर भारताने दहशतवादाचे केंद्र असलेल्या पाकिस्तानला धडा शिकवल्यावरही ते संतापतात! त्यांच्या आणि त्याच पठडीतील अनेक राष्ट्रप्रमुखांच्या ढोंगामुळे दहशतवादाचा समूळ नायनाट अशक्य ठरत आहे. आपल्या सत्तेची सुरक्षितता, आपले व्यावसायिक हित याच्यासमोर सर्वसामान्य नागरिकांचे जीवन त्यांनी वेठीला धरले आहे. सामान्यांच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवणारे दहशतवादी अधिक धोकादायक की, त्यांना बळ देणारे कथित लोकशाही देशांचे प्रमुख जागतिक शांततेसाठी धोक्याचे, हे ठरविणे अवघड झाले आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये हमासने इस्रायलवर हल्ला करून बाराशे नागरिकांना ठार मारले. २५१ जणांचे अपहरण पाहिले नाही, हे धक्कादायक होय. हल्लेखोर नावीदकडे बंदुकांचा परवाना होता. आयसीसबरोबर संबंध असल्याच्या आरोपावरून त्याची चौकशीदेखील झाली होती. तरी शस्त्र परवाना आणि खुलेआम फिरण्याची मुभा, हा गुन्ह्यासाठी दिला गेलेला परवानाच मानावा लागेल. २०२३ मधील हल्ल्यानंतर इस्रायलने गाझा पट्टीला लक्ष्य बनवले. इस्रायलच्या कारवाईत गाझा पट्टी पूर्ण बेचिराख झाली असून लाखाच्या घरात पॅलेस्टाईनमधील नागरिकांचा बळी गेला. अद्याप हा संघर्ष थांबलेला नाही. इस्रायल आणि हमास यांच्यात शस्त्रसंधी झाल्याचा देखावा ट्रम्प यांच्या पुढाकाराने करण्यात आला. ना त्या करारावर इस्रायलची स्वाक्षरी आहे, ना त्यावेळी हमासच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. ट्रम्प यांचा शस्त्रसंधीचा बनाव टिकणारा नव्हताच. हमासचा नेता सिनवार हा इस्रायलवर झालेल्या हल्ल्याचा सूत्रधार होता. तो मारला गेल्यानंतर हमासची ताकद लक्षणीयरीत्या कमी झाली. त्यानंतर इस्रायलने हिजबुल्लाकडे मोर्चा वळवला. दहशतवादाला प्रत्युत्तर नेमक्या कोणत्या पद्धतीने दिले पाहिजे, याचे संकेत आहेत; मात्र आक्रमक धोरणातून ज्यांचा दहशतवादाशी संबंध नाही, असे हजारो नागरिक भरडले जातात. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या आक्रमक

# मानवतेचे गुन्हेगार

करण्यात आले. सिडनीतील बॉन्डी किनार्यावर झालेला हल्ला त्याच स्वरूपाचा आहे. हनुक्का उत्सव साजरा करण्यासाठी ज्यू धर्मीय शेकडोंच्या संख्येने समुद्र किनार्यावर जमले होते. तीच वेळ साजिद अक्रम आणि त्याचा मुलगा नावीद यांनी निवडली. साजिद पर्यटन व्हिसावर ऑस्ट्रेलियात आला होता, तर नावीद दहा वर्षांपासून ऑस्ट्रेलियात राहतो.



**सुरक्षा व्यवस्थेत अक्षम्य ढिलाई**

निज्जर प्रकरणात भारताला गोवण्यासाठी अमेरिकेकडे कथित पुरावे देणार्या ऑस्ट्रेलियातील यंत्रणांचे पितळ या घटनेमुळे उघडे पडले. दरवर्षी हनुक्का उत्सवासाठी ज्यू धर्मीय समुद्र किनार्यावर एकत्र येतात, ते हल्लेखोरांचे लक्ष्य ठरू शकतात, याची तेथील गुप्तहेर यंत्रणांना खबरबात नव्हती. आम्ही तीन महिन्यांपूर्वीच ऑस्ट्रेलियात ज्यू धर्मीयांना धोका होऊ शकतो, असा सावधानतेचा इशारा दिला होता, असे इस्रायलकडून स्पष्ट करण्यात आले. तरीही ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानिज यांनी त्याकडे गांभीर्याने धोरणामुळे पॅलेस्टाईनची राखरांगोळी झाल्याची सल अनेक देशांना आहे. शांततेऐवजी विद्वेषाची धग वाढणार असेल, तर इस्रायलला अपेक्षित असलेली शांतता कशी निर्माण होणार? किमान त्या देशातील मध्यममार्गी पक्ष, त्यांचे नेतृत्व यांनी याचा विचार केला पाहिजे. पॅलेस्टाईनच्या उभारणीसाठी मिळणारी कंत्राटे ट्रम्प यांच्यासारख्यांना महत्त्वाची वाटत असतील, तर अद्याप न थांबलेल्या तेथील संघर्षाला दहशतवादाविरुद्धचा संघर्ष म्हणता येईल का? ऑस्ट्रेलियातील घटनेनंतर संघर्षाची व्याप्ती आणखी वाढणार आहे. दहशतवाद आणि त्याचे पाठीराखे, यांच्याविरुद्धच्या लढाईत कोणाचेही हितसंबंध आल्यास ही लढाई अनिर्णित राहणार, हे गृहीत धरावे लागेल.

# हिवाळ्यात भिजवलेले मनुके खा; त्याचे फायदे जाणून घ्या



हिवाळ्याच्या काळात लोकांना सर्दी, खोकला आणि फ्लूसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या ऋतूत आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा हवामान सतत बदलत असते.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, बदलत्या हवामानामुळे आपल्याला आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः, आपण आपल्या आहाराकडे विशेष लक्ष दिले पाहिजे; योग्य आहार घेतल्याने आपण निरोगी राहू शकतो. हिवाळ्यात भिजवलेले मनुके खाणे फायदेशीर ठरू शकते

हिवाळ्याच्या काळात शरीराला अतिरिक्त ऊर्जा, उष्णता आणि पोषणाची आवश्यकता असते. भिजवलेले मनुके हे एक नैसर्गिक सुपरफूड मानले जातात. मनुक्यामध्ये लोह, कॅल्शियम, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे थंडीच्या काळात शरीराला आतून मजबूत करतात.

पचनसंस्था निरोगी ठेवा

रात्रभर मनुके भिजवून सकाळी खाल्ल्याने पचन सुधारण्यास मदत होते. त्यातील फायबर घटक आतडे स्वच्छ करतात आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम देतात. हिवाळ्यात, जेव्हा पचन मंदावते तेव्हा भिजवलेले मनुके विशेषतः फायदेशीर असतात.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करा

भिजवलेल्या मनुक्यांमधील अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे तुमच्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. नियमित सेवनाने सर्दी-खोकला आणि हंगामी संसर्ग होण्याचा धोका कमी होतो , जे हिवाळ्यात सामान्य असतात.

रक्त आणि हाडांसाठी फायदेशीर

मनुका हे लोहाचा चांगला स्रोत आहे, ज्यामुळे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी सुधारते. शिवाय, त्यातील कॅल्शियम आणि बोरॉन हाडे मजबूत करण्यास मदत करतात, ज्यामुळे हिवाळ्यात सांध्यांच्या समस्या टाळता येतात.

ऊर्जा आणि त्वचेसाठी फायदेशीर

सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले मनुके खाल्ल्याने त्वरित ऊर्जा मिळते आणि थकवा कमी होतो. ते त्वचेला आतून पोषण देते, हिवाळ्यात कोरडेपणा आणि निस्तेजपणा कमी करण्यास मदत करते.एकंदरीत, हिवाळ्यात भिजवलेल्या मनुकांचा आहारात समावेश करणे हे आरोग्यासाठी एक सोपा आणि प्रभावी उपाय मानला जातो.अस्वीकरण या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# कोणत्या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे वृद्धत्वाची लक्षणे दिसू शकतात



वय वाढणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, परंतु कधीकधी असे वाटू शकते की चेहरा अकाली थकलेला आणि सुरकुत्या पडलेला आहे. तरुण वयात सैल त्वचा, कोरडेपणा आणि निस्तेज रंग हे बहुतेकदा व्हिटॅमिनच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. योग्य पोषणाशिवाय, त्वचेतील कोलेजन कमी होते, ज्यामुळे वय वाढण्याची सुरुवातीची लक्षणे दिसतात. कोणत्या जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे शरीरावर काय परिणाम होतो जाणून घेऊ या.

व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे चेहऱ्याची चमक कमी होते.

व्हिटॅमिन सी हे त्वचेसाठी सर्वात महत्वाचे पोषक तत्वांपैकी एक मानले जाते. ते कोलेजन तयार करण्यास मदत करते, एक प्रथिने जे त्वचा मजबूत आणि निरोगी ठेवते. याच्या कमतरतेमुळे त्वचेची लवचिकता कमी होऊ शकते आणि सुरकुत्या दिसू शकतात.

काय खावे: आवळा, संत्री, लिंबू, स्ट्रॉबेरी, टोमॅटो आणि किवीसारखे व्हिटॅमिन सी समृद्ध असलेले पदार्थ दररोज खा. इच्छित असल्यास, तुम्ही व्हिटॅमिन सी असलेले स्किनकेअर सीरम किंवा क्रीम देखील वापरू शकता, जे चमकणारी त्वचा राखण्यास मदत करते.

व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे काय होते?

व्हिटॅमिन ई हे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे जे त्वचेच्या पेशींना नुकसान होण्यापासून वाचवते. जेव्हा त्याची कमतरता असते तेव्हा त्वचा कोरडी, निस्तेज आणि खडबडीत दिसू शकते, ज्यामुळे वृद्धत्वाची सुरुवातीची लक्षणे दिसतात.

काय खावे: तुमच्या आहारात बदाम, सूर्यफूल बियाणे, एवोकॅडो, पालक आणि हिरव्या भाज्यांचा समावेश करा. बदाम तेल किंवा व्हिटॅमिन ई कॅप्सूलपासून बनवलेल्या तेलाने त्वचेला हलक्या हाताने मसाज केल्याने सुरकुत्या कमी होण्यास मदत होते

व्हिटॅमिन ए च्या कमतरतेमुळे त्वचेची दुरुस्ती होण्यास अडथळा येतो.

व्हिटॅमिन ए त्वचेच्या पुनरुत्पादनात, नवीन पेशी तयार होण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावते. या कमतरतेमुळे त्वचेची स्वतःची दुरुस्ती करण्याची क्षमता कमी होते, ज्यामुळे बारीक रेषा दिसतात आणि सुरकुत्या खोलवर येतात.

काय खावे: गाजर, गोड बटाटे, भोपळा, अंड्याचा पिवळा भाग आणि पालक हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्रोत आहेत. तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने रेटिनॉल-आधारित स्किनकेअर उत्पादने देखील वापरली जाऊ शकतात.

अकाली वृद्धत्व कसे रोखायचे?

पुरेशी झोप घ्या आणि ताण कमी करा.

जंक फूड टाळा आणि हायड्रेशन राखा.

तुमच्या त्वचेला अतिनील किरणांपासून वाचवण्यासाठी दररोज सनस्क्रीन लावा.

प्रथिने आणि अँटिऑक्सिडंट्स जास्त असलेले आहार घ्या.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील.

**(क्रमश. )**




## विनोद

बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू - माझ्याच वयाचे आहेत.

बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## संदेश

Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khel-teho?
santa-mobile mai snake wala .

## सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.

- डॉन प्याट


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. पुरा केलेला हिशोब, फेडलेला
४. सुखी माणसाचे वस्त्र
८. तीन पानांचे म्हणीतील झाड
१०. बोकड
१२. घाबरणे
१३. दशावतारातील त्रिविक्रम
१६. राजाचा कालावधी
१९. पौर्णिमा
२०. आजूबाजूला
२१. विषमच्या विरुद्ध
२३. मेघसारखा सावळा-श्रीकृष्ण
२५. घरातील मोठी माणसे
२७. चेहऱ्यावरील तेज
२९. युद्धात माघार न घेणारा वीर
३१. अवधान, लक्ष
३२. नवरदेव
३४. छत्रपतींचा शूर सेनापती-नेताजीचे आडनाव
३६. गरीब, निर्धन
३७. पार्वतीचे एक नाव, कजाग बाईचे विशेषण
३९. दणकट, भक्कम
४१. धन्यवाद
४२. प्रजा
४३. नक्की, खात्रीने
४४. स्पष्टवक्ता
४६. फाक, काप, तुकडा, ढीग
४८. ज्वाला, अग्नी
४९. काचेला आरसा करणारा
५०. इंग्रजीत धडा
५२. अभिनेता
५३. नम्र, वाकलेला
५५. भेदभाव
५८. ओढ्यावरील कच्चा पूल
६०. विदुराला हिणवताना केला जाणारा उल्लेख
६१. हवेतील शीतलता
६३. चीजवस्तू
६५. चकाकी
६६. जुळे
६८. हिंदीत दीर
६९. शिंका आणणारी तंबाखू
७०. दोऱ्याने सांधणारी
७१. कवाड
७२. गेरू
७३. सत्य
७४. सदोदित, वरचेवर
७७. दुसऱ्यावर केलेले उपकार
७९. हसतमुख
८०. पुष्कळ, वारेमाप
८२. नियमित यात्रेला जाणारा
८३. मत देणारा
८४. पाणी, रस

## उभे शब्द

१. झटक्यात, हा हा म्हणता
२. हात
३. शक्ती, बळ
५. औषध
६. नमस्कार
७. एक चतुर्थांश
८. पंख
९. एकूणात प्रमाण
१०. फुरसत, सवड
११. केसांची गुंतलेली बट
१४. चौक
१५. त्वरा, घाई
१७. जास्वंद
१८. या देशाच्या हरतऱ्हेच्या स्वस्त वस्तूंनी भारतीय बाजारपेठेवर अतिक्रमण केले आहे
२०. आश्रय, टेकू
२२. चाळीस शेर
२३. निवासस्थान
२४. काळसर
२५. अरण्य
२६. चटकन
२८. कष्ट, मेहनत
३०. रावणाची बहीण
३१. वजन
३३. लोखंडी वस्तू बनवणारा
३४. झाडाभोवतीचा कट्टा
३५. कारस्थान
३६. एक अप्सरा
३८. मातृभाषा
३९. पंकज
४०. वाळा
४१. सुस्ती, कंटाळा
४३. सहस्त्रवेळा
४४. पळून गेलेला
४५. पार्थिव
४६. आचारी
४७. झटकन
४९. पातक
५१. फायदा
५४. नेत्रसुखद, मनोहर
५५. आपलेपणा, ममता
५६. वार्ताहर
५७. डमरूच्या तालावर नाचणारे माकड
५९. श्रीकृष्णाचे वडील
६२. मुदतीचा करार
६३. वर्ष, सन
६४. भ्रम, जादू
६७. एक सुगंधी वनस्पती
६९. वाईट होण्यासंबधीच्या इच्छा, शाप
७०. पुत्र, मुलगा
७१. मध्यम प्रमाण
७२. व्यवस्था, काम
७३. पिकाचा गाळसाळ
७३अ. पाच शेरासाठी एक जुने मोजमाप
७५. वेषभूषेसह केलेली तालीम
७६. अमंगल, बीभात्स
७८. पान
७९. साद, बोलावणे
८१. आवाज, गोंगाट

## आडवे उत्तरे

१.चुकता ४.सदरा ८.पळस १०.अज १२.टरकणे १३.वामनावतार १६.राजवट १९.राका २०.आसपास २१.सम २३.घनश्याम २५.वडीलधारी २७.रया २९.रणशूर ३१.भान ३२.वर ३४.पालकर ३६.ट्रंक ३७.महामाया ३९.कणखर ४१.आभार ४२.रयत ४३.हमखास ४४.फटकळ ४६.खाक ४८.जाळ ४९.पारा ५०.लेसन ५२.नट ५३.लीन ५५.आपपरभाव ५८.साकव ६०.दासीपुत्र ६१.गारवा ६३.सामानसुमान ६५.लकाकी ६६.यमल ६८.देवर ६९.तपकीर ७१.दार ७२.काव ७३.सत ७४.वारंवार ७७.परोपकार ७९.हसरा ८०.भाराभर ८२.वारकरी ८३.मतदार ८४.द्रव

## उभे उत्तरे

१.चुटकीसरशी २.कर ३.ताकद ५.दवा ६.रामराम ७.पाव ८.पर ९.सरासरी १०.अवसर ११.जट १४.नाका १५.तातडी १७.जपा १८.चीन २०.आधार २२.मण २३.घर २४.शामल २५.वन २६.लवकर २८.यातायत ३०.शूर्पणखा ३१.भार ३३.लोहार ३४.पार ३५.कपट ३६.रंभा ३८.मायबोली ३९.कमळ ४०.खस ४१.आळस ४३.हजारदा ४४.फरार ४५.कलेवर ४६.खानसामा ४७.पटकन ४९.पाप ५१.नफा ५४.नयनरम्य ५५.अपुलकी ५६.पत्रकार ५७.भागाबाई ५९.वसुदेव ६२.वायदा ६३.सल ६४.माव ६७.मरवा ६९.तळपट ७०.सुत ७१.पासरी ७२.कारभार ७३.सरवा ७३अ.पासरी ७५.रंगीत ७६.अभद्र ७८.पर्ण ७९.हाक ८१.रव



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### श्रीलंकेच्या वर्ल्डकप विजेत्या कर्णधाराला होणार अटक

कोलंबो-१९९६ च्या क्रिकेट विश्वचषकात श्रीलंकेला विजय मिळवून देणारे कर्णधार अर्जुन रणतुंगा यांना अटक होणार असल्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी रणतुंगा यांनी वजन घटवल्याचा एक फोटो तुफान व्हायरल होत होता. यानंतर आता त्यांच्याबाबत एक मोठी धक्कादायक माहिती समोर आली आहे. अर्जुन रणतुंगा यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होणार आहे.
श्रीलंकेच्या सरकारमध्ये पेट्रोलियम उद्योग मंत्री असताना भ्रष्टाचाराचे आरोप त्यांच्याविरूद्ध सुरू झाले होते. अर्जुन रणतुंगा यांचा मोठा भाऊ, दम्मिका जो त्यावेळी सिलोन पेट्रोलियम कॉर्पोरेशनचा अध्यक्ष होता, त्यालाही या आरोपात दोषी ठरवण्यात आले. १५ डिसेंबरला पोलिसांनी रणतुंगा यांचा मोठा भाऊ दम्मिका याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक केली. पण, नंतर त्याला जामीन मंजूर करण्यात आला.

### वैभव सूर्यवंशीच्या मित्राचं रौद्र रूप! अभिज्ञान कुंडूने १२१ चेंडूंत झळकावलं वादळी द्विशतक

मुंबई -सध्या अंडर-१९ आशिया चषक युएईमध्ये खेळवला जात आहे. भारतीय संघाने या स्पर्धेत दोन सामने जिंकले आहेत. यानंतर संघाचा तिसरा सामना मलेशियाविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात वैभव सूर्यवंशी वादळी फटकेबाजी करत अर्धशतक झळकावलं. त्यानंतर संघातील अभिज्ञान कुंडू याने द्विशतक करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. यष्टीरक्षक फलंदाज असलेल्या अभिज्ञान कुंडू याने मलेशियाच्या गोलंदाजांची धुलाई करत द्विशतकी खेळीच्या बळावर संघाची धावसंख्या ४०० पार नेली आहे.अभिज्ञान कुंडू याने सुरूवातीला ८० चेंडूत शतक झळकावलं. तर फक्त १२१ चेंडूंत त्याने वादळी फटकेबाजी करत द्विशतक पूर्ण केलं. अभिज्ञान १२५ चेंडूंत १७ चौकार व ९ षटकारांसह २०९ धावांची खेळी करत नाबाद परतला.

### अबुधाबीतील आयपीएल लिलावाकडे नाशिकची नजर, कारण....

नाशिक-इंडियन प्रिमियर लीग क्रिकेट अर्थात आयपीएलचे आकर्षणच वेगळे आहे. २०२६ या वर्षासाठी मंगळवारी अबुधाबी येथे मिनी लिलाव होणार आहे. प्रत्येक क्रिकेटपटूचे स्वप्न एकदा तरी आयपीएलमध्ये खेळावे हे असते. आयपीएलमध्ये इतर स्पर्धांच्या मानाने मिळणारा सर्वाधिक पैसा हे तर त्यामागील एक कारण आहेच. शिवाय, या स्पर्धेतून झटपट मिळणारी लोकप्रियताही खेळाडूंना आकर्षित करीत आहे.युवा खेळाडूंना आयपीएल आपल्यातील गुणवत्ता दाखविण्यासाठी एक मंच ठरत आहे. मागील आयपीएलमध्ये बिहारचा वैभव सूर्यवंशी, मुंबईचा आयुष म्हात्रे ही दोन नावे गाजली. त्यामुळे आयपीएल संघ मालकांचे अशाच धडाकेबाज युवा खेळाडूंकडे अधिक लक्ष आहे. आगामी आयपीएल स्पर्धेसाठी १६ डिसेंबर रोजी अबुधाबी येथे लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे.

### फक्त ११ सामन्यांतून थेट १४ कोटी; चेन्नईने कुणावर लावली मोठी बाजी?

मुंबई १६ डिसेंबर (पीएसआय)
आयपीएलचा मिनी लिलाव दुबईत झाला. यंदा या लिलावात ३६९ खेळाडू सहभागी झाले होते. या लिलावात सर्वाधिक चर्चा झाली ती ऑस्ट्रेलियाच्या कॅमरुन ग्रीनच्या बोलीची. कोलकाता नाईट रायडर्सने कॅमरुन ग्रीनला तब्बल २५.२० कोटी रुपयांना आपल्या संघात सामील करून घेतले. कॅमरुन ग्रीनसाठी चेन्नई सुपर किंग्जनेही शेवटपर्यंत जोरदार प्रयत्न केले, मात्र अखेर त्यांना माघार घ्यावी लागली.कॅमरुन ग्रीन हातातून निसटल्यावर चेन्नई सुपर किंग्जने नवख्या खेळाडूवर मोठी बाजी लावली. उत्तर प्रदेशच्या अष्टपैलू खेळाडू प्रशांत वीरला चेन्नईने १४.२० कोटी रुपयांना खरेदी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# आयपीएल लिलावात नवख्या खेळाडूंवर कोटीच्या कोटी



मुंबई : इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मंगळवारी झालेल्या छोटेखानी लिलावात उदयोन्मुख (अनकॅप्ड) अर्थात भारतासाठी अद्याप न खेळलेल्या खेळाडूंना चांगलाच 'भाव' मिळाला. चेन्नई सुपर किंग्ज उदयोन्मुख खेळाडूंना संघात स्थान देण्यात अग्रेसर ठरले. त्यांनी राजस्थानचा यष्टिरक्षक-फलंदाज कार्तिक शर्मा आणि उत्तर प्रदेशचा अष्टपैलू प्रशांत वीर यांना समान १४.२० कोटी रुपयांच्या रकमेसह संघात स्थान दिले. उदयोन्मुख खेळाडूंसाठीची ही आजवरची विक्रमी बोली ठरली.
यंदाच्या 'आयपीएल' लिलावातील सर्वाधिक बोली ऑस्ट्रेलियाच्या कॅमरून ग्रीनवर लागली. त्याला २५.२० कोटी रुपयांना कोलकाता नाइट रायडर्सने आपल्या ताफ्यात घेतले. तो आजवरच्या 'आयपीएल' इतिहासातील सर्वांत महागडा परदेशी खेळाडू ठरला. प्रशांत आणि कार्तिक यांच्यासह अकिब नबी दार (८.४० कोटी, दिल्ली कॅपिटल्स), मंगेश यादव (५.२० कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु), तेजस्वी सिंह दहिया (३ कोटी, कोलकाता नाइट रायडर्स), अक्षत रघुवंशी (२.२० कोटी, लखनऊ सुपर जायंट्स), सलील अरोरा (१.५० कोटी, सनरायजर्स हैदराबाद) या उदयोन्मुख खेळाडूंनाही मोठी रक्कम मिळाली.ग्रीनसाठी चढाओढ कॅमरून ग्रीनसाठी लिलावात बरीच चढाओढ पाहायला मिळाली. अखेरीस तो कोलकाता संघाचा भाग झाला. ग्रीनने याआधी २०२३ मध्ये मुंबई इंडियन्स संघाकडून खेळला. मुंबईने १७.५ कोटी रुपयांना संघात घेतले. तेव्हा त्याने ४५२ धावा केल्या. यानंतर तो रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचा भाग झाला. त्या हंगामात त्याने २५५ धावा केल्या आणि १० बळी मिळवले. गेल्या हंगामापूर्वी पाठीच्या दुखापतीमुळे त्याने लिलावासाठी नाव नोंदवले नव्हते. मात्र त्यानंतर त्याने ऑस्ट्रेलियाकडून यशस्वी पुनरागमन केले आहे.उदयोन्मुख खेळाडूंविषयीःकार्तिक शर्मा : यष्टिरक्षक-फलंदाज असलेल्या कार्तिकची लिलावापूर्वीच चर्चा होती. उत्तुंग षट्कार लगावण्याच्या क्षमतेमुळे अनेक संघांचे त्याच्यावर लक्ष होते. देशांतर्गत स्पर्धांत राजस्थानकडून खेळणाऱ्या कार्तिकने १२ ट्वेन्टी-२० सामन्यांत १६४ च्या स्ट्राइक रेट आणि २८ षटकारांच्या मदतीने ३३४ धावा केल्या आहेत.

# गडचिरोलीच्या श्वेताने दुबईत जिंकले सुवर्ण





गडचिरोली : चामोर्शी तालुक्यातील अनखोडा येथील सामान्य आदिवासी कुटुंबातील श्वेता भास्कर कोवेला दुबई येथे झालेल्या आशिया युवा पॅरा गेम्स-२०२५ मध्ये पॅरा आर्चरीमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचा गौरव मिळाला. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशिया खंडातील विविध देशांतील तज्ज्ञ पॅरा खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.
मर्यादित साधनसुविधा आणि आर्थिक अडचणींवर मात करत श्वेताने सातत्यपूर्ण सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचा विश्वास यावर आधारित मेहनतीने आपली क्षमता सिद्ध केली. राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर तिला दुबईतील या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. अंतिम फेरीत श्वेताने अचूक लक्ष्यभेद, संयम आणि आत्मविश्वासाचा जोर लावून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. श्वेताचे हे यश वैयक्तिकच नाही, तर गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. सर्व स्तरांतून कौतुक होत असून, तिला पुढील जागतिक आणि पॅरा ऑलिम्पिक स्पर्धांसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. श्वेताने जिद्द, मेहनत आणि स्वप्नांवर विश्वास ठेवल्याने यश निश्चितच मिळते हे दाखवून दिले आहे.

# विश्वचषक विजेता कर्णधार अर्जुन रणतुंगावर अटकेची टांगती तलवार



कोलंबो -१९९६ च्या श्रीलंका क्रिकेट संघाच्या विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार अर्जुन रणतुंगा यांच्या अडचणी वाढत असल्याचं दिसून येत आहे. पेट्रोलियम मंत्री असताना झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवरुन त्यांना अटक करण्यात येणार असल्याची माहिती श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाला दिली आहे. ही माहिती कोलंबो न्यायालयाला देण्यात आली.
करारामुळं श्रीलंकेला मोठं नुकसान : श्रीलंकेतील भ्रष्टाचारविरोधी संस्थेच्या, लाचखोरीच्या आरोपांची चौकशी करणाऱ्या आयोगाच्या (ण्घ्अँध्ण) मते, अर्जुन रणतुंगा आणि त्यांच्या भावावर तेल खरेदी प्रक्रियेत बदल केल्याचा आणि काही काळासाठी चढ्या किमतीत खरेदी केल्याचा आरोप आहे. एजन्सीनं म्हटलं आहे की २०१७ मध्ये केलेल्या २७ करारांमुळं श्रीलंकेच्या सरकारला अंदाजे ८०० दशलक्ष श्रीलंकन रुपयांचं (अंदाजे २३५ दशलक्ष भारतीय रुपये) नुकसान झालं.
मायदेशी परतल्यावर अटक : ण्घ्अँध्ण नं कोलंबो दंडाधिकारी असांगा बोडारागामा यांना कळवलं की अर्जुन रणतुंगा सध्या परदेशात आहे आणि तो देशात परतल्यानंतर त्याला अटक केली जाईल. त्याचा मोठा भाऊ धम्मिका रणतुंगा याला १५ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली. मात्र, नंतर त्याला जामिनावर सोडण्यात आलं. हे लक्षात घेण्यासारखे आहे की २०१७ मध्ये जेव्हा या कथित अनियमितता घडल्या तेव्हा अर्जुन रणतुंगा श्रीलंका सरकारमध्ये पेट्रोलियम उद्योग मंत्री होते आणि धम्मिका हे सरकारी मालकीच्या सिलोन पेट्रोलियम कॉर्पोरेशन (सीपीसी) चे प्रमुख होते.
१९९६ मध्ये श्रीलंकेला बनवलं विश्वविजेता : न्यायालयानं धम्मिका रणतुंगा यांच्यावर प्रवास बंदी देखील घातली आहे. धम्मिका यांच्याकडे श्रीलंका आणि अमेरिकेचं दुहेरी नागरिकत्व आहे. या प्रकरणातील पुढील सुनावणी १३ मार्च रोजी होणार आहे. ६२ वर्षीय अर्जुन रणतुंगा हे श्रीलंकेच्या क्रिकेटमधील सर्वात मोठ्या नावांपैकी एक आहेत. रणतुंगाच्या नेतृत्वाखाली १९९६ मध्ये ऑस्ट्रेलियाला हरवून श्रीलंका विश्वविजेता बनला होता.भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई : रणतुंगा बंधूंविरुद्धची ही कारवाई राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या सरकारनं केलेल्या व्यापक भ्रष्टाचारविरोधी मोहिमेचा भाग मानली जाते. दिसानायके गेल्या वर्षी सत्तेत आले आणि त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई करण्याचं आश्वासन दिलं. विशेष म्हणजे रणतुंगा कुटुंबातील आणखी एक भाऊ प्रसन्न रणतुंगा यांना गेल्या महिन्यात विमा फसवणूक प्रकरणात अटक करण्यात आली होती. प्रसन्ना रणतुंगा हे माजी पर्यटन मंत्री होते. तो खटला अजूनही प्रलंबित आहे, तर जून २०२२ मध्ये त्यांना एका व्यावसायिकाकडून पैसे उकळल्याबद्दल दोषी ठरवण्यात आलं.

# आयपीएल ऑक्शनच्या इतिहासातील सर्वात महागड्या विदेशी खेळाडूचा दिलदारपणा, कोट्यवधी रुपये करणार दान




मुंबई -इंडियन प्रीमियर लीग ही जगातील सर्वात मोठ्या टी २० लीगपैकी एक असून पुढील वर्षी याचा १९ वा सीजन खेळवला जाणार आहे. आयपीएल २०२६ साठी १६ डिसेंबर रोजी मिनी ऑक्शन अबुदाबीमध्ये पार पडत आहे. यात एकूण १० फ्रेंचायझींनी सहभाग घेतला असून येथे एकूण ३५० खेळाडूंवर बोली लावली जाईल. यात ऑस्ट्रेलियाचा स्टार क्रिकेटर कॅमरुन ग्रीन हा ऑक्शन टेबलवर आला होता. त्याला कोलकाता नाईट रायडर्सने मोठी बोली लावून आपल्या संघात घेतलं. यामुळे तो आतापर्यंतच्या आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा विदेश खेळाडू ठरला.
कॅमरुन ग्रीनसाठी मोठी चढाओढ : कॅमरुन ग्रीन हा आयपीएल २०२५ मध्ये आरसीबीचा भाग होता, मात्र त्याला १९ व्या सीजनच्या ऑक्शनपूर्वी आरसीबीने रिलीज केले. त्यामुळे ग्रीन ऑक्शनमध्ये आला. कॅमरुन ग्रीनला घेण्यासाठी कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, चेन्नई सुपरकिंग्स या फ्रेंचायझींमध्ये चढाओढ होती. कॅमरुन ग्रीन आपल्या संघात घेण्यासाठी चेन्नईने त्यांच्या आयपीएल ऑक्शन इतिहासातील सर्वात मोठी बोली लावली होती, मात्र केकेआरला काहीही करून ग्रीनला त्यांच्या संघात घ्यायचं होतं ज्यामुळे त्यांनी बोली वाढवली. अखेर कोलकाता नाईट रायडर्सने २५. २० कोटींना त्याला आपल्या संघात घेतलं. त्यामुळे ग्रीन हा आयपीएल ऑक्शनच्या इतिहासातील सर्वात महागडा विदेश खेळाडू ठरला. यापूर्वी आयपीएल २०२४ मध्ये ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा विदेशी खेळाडू होता. त्याच्यावर २४.७५ कोटींची बोली केकेआरने लावली होती.
कॅमरुन ग्रीनचा दिलदारपणा : कॅमरुन ग्रीन हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा विदेशी खेळाडू ठरला असला तरी तो २५. २० कोटी रुपये घरी घेऊन जाणार नाही. कॅमरुन ग्रीनने स्वत:ला २ कोटी रुपयांना ऑक्शनमध्ये लिस्ट केले होते.

# २०20 ला आयपीएल जिंकवणारा हिरो मुंबईच्या ताफ्यात

मुंबई -आयपीएल २०२६ च्या मेगा लिलावात आज अबुधाबीमध्ये सुरूवात झाली आहे. या लिलावात ३६९ खेळाडूंवर बोली लागणार आहे. पण ७७ खेळाडूंची खरेदी केली जाणार आहे. या लिलावात मुंबईच्या पर्समध्ये सर्वाधिक कमी म्हणजेच २.७५ कोटी रूपये उरले होते. त्यामुळे मुंबई इंडियन्स नेमकी बोली कशी लावणार असा प्रश्न होता. पण मुंबईने तासाभरात बोली लावली आहे. यामध्ये मुंबईच्या ताफ्यात त्यांचा जुना भिडू आलेला आहे. हा तोच खेळाडू आहे ज्याने रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सला ट्रॉफी जिंकवून दिली होती.दरम्यान हा खेळाडू नेमका कोण आहे? हे जाणून घेऊयात.खरं तर मुंबईच्या पर्समध्ये सर्वाधिक कमी म्हणजेच २.७५ कोटी रूपये उरले होते.त्यात मुंबईला पाच खेळाडूंची खरेदी करायची होती. त्यात एक खेळाडू हा परदेशी होता.त्यामुळे लिलाव सुरू व्हायच्या तासाभरातच आता मुंबई इंडियन्सने त्याच्या जून्या भिडूला ताफ्यात घेतले आहे. हा जूना भिडू म्हणजे क्विंटन डिकॉक आहे. क्विंटक डिकॉक याआधी मुंबई इंडियन्समधून आयपीएल खेळला आहे.विशेष म्हणजे त्याने २०२० च्या हंगामात रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाला आयपीएल ट्रॉफी जिंकवून दिली होती. त्यामुळे आपला जूनाच खेळाडू ताफ्यात आल्याने मुंबईची ताकद वाढली आहे.दरम्यान क्विंटन डिकॉकची बेस प्राईज १ कोटी रूपये होती.

# क्रांती मैदानात अर्जेंटिनाचा फुटबॉल स्टार लियोनेल मेसी मानिया आणि नाराजलेली जनता

**कोलकात्यातील विवेकानंद युवा क्रांती मैदानात अर्जेंटिनाचा फुटबॉल स्टार लियोनेल मेसी याचे आगमन झाल्यावर त्याला पाहण्यासाठी हजारो प्रेक्षकांनी गर्दी केली होती. त्यामुळे शानदार समारंभाचे रूपांतर अभूतपूर्व गोंधळात आणि निषेध निदर्शनांत झाले. प्रचंड रक्कम भरून हजारो प्रेक्षकांनी मेसीच्या एका दर्शनासाठी या मैदानात गर्दी केली होती पण त्यांच्या पदरी अखेर निराशाच आली आणि चाहत्यांचा संताप झाला. नंतर जे झाले ते कधीही न कल्पना केलेले होते. बकेट, सीट्स, व्हीआयपी सोफ्यांची मोडतोड आणि जेथे हा कार्यक्रम होता तेथे नासधूस आणि काही ठिकाणी तर आग लावण्यात आली. अखेर आयोजकांना मेसीची भेट थोड्या वेळातच आटोपती घ्यावी लागली. आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर केली आणि कार्यक्रमाची गैरव्यवस्था आणि गोंधळ का झाला याचा तपास सुरू आहे. पण या प्रकारात भारताची अब्रू गेली आणि जो देश विकासाच्या वाटेवर आहे त्याची लक्तरे कोलकात्यात निघाली.**

लोकांनी एका तिकिटासाठी तब्बल दहा हजार आणि १२ हजार इतके प्रचंड पैसे मोजले होते. पण त्यांना मेसीचे दर्शनही नीट होऊ शकले नाही. ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर करताना मेसीची मनापासून माफी मागितली आणि या दुर्दैवी प्रकाराबद्दल आयोजकांना दोषी ठरवले. पण मुळात आपल्याकडे अशा कार्यक्रमांसाठी चोख व्यवस्था नाही? मेसीसारखे लोकप्रिय खेळाडू आपल्याकडे येत असताना आपल्याकडे अशा वेळेस प्रचंड गर्दी कशी हाताळायची त्याचे तंत्रच नाही? मुळात हे साल्ट लेक स्टेडियम इतक्या सेलेब्रिटीचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुरेसे होते का हा प्रश्न आहे. त्या ऐवजी इडन गार्डन या स्टेडियमवर हा कार्यक्रम ठेवला असता, तर अशी गर्दी आणि ममता सरकारची बेअब्रूही झाली नसती. आता मेसीचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकाला पोलिसांनी विमानतळावर अटक केली आहे. त्याच्याविरोधात आता कडक कारवाई केली जाणार असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. आता या गोंधळाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जोरदार शाब्दिक युद्ध जुंपले आहे. या गैरव्यवस्थेबद्दल दोघांनीही एकमेकांवर जबाबदार असल्याचे आरोप केलेत. पण सर्वात जास्त जबाबदारी ही तृणमूल काँग्रेसची होती. कारण तो पक्ष सत्ताधारी आहे. पश्चिम बंगालमध्ये २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. त्यादृष्टीने ममतांसाठी हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडणे हे महत्त्वाचे होते. पण कोलकाता प्रशासन त्याबाबतीत




अपयशी ठरले.

कोलकाता, गोवा या शहरात फुटबॉल हा खेळ लोकप्रिय आहे. त्यामुळे या शहरांना वेगळाच दर्जा आहे. हे लक्षात घेऊन तरी निदान कोलकात्यात तरी फुटबॉल इव्हेंट असला तर तो व्यवस्थित पार पडावा अशी तेथील राज्य सरकारांनी दक्षता घ्यायला हवी. पण राज्य सरकारने आपली जबाबदारी नीट पार पाडली नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. या सर्व प्रकारात एकच गोष्ट समोर आली आहे ती म्हणजे गर्दी व्यवस्थापन आणि तिचे तंत्र याबाबतीत आपण अजून खूप मागे आहोत. गर्दीचे व्यवस्थापन आणि राजकारण यांची सरमिसळ यात आपण कुशल नाही हे या घटनेवरून सिद्ध झाले. जी घटना कोलकात्यासाठी ऐतिहासिक प्रसंग होऊ शकली असती ती या गैरव्यवस्थेमुळे आणि चाहत्यांच्या गोंधळामुळे बाजूला पडली आणि राजकीय युद्ध सुरू झाले. आता यातून मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा घटना घडतात तेव्हा त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणे आवश्यक आहे. कायदा आणि सुव्यवस्था कोसळण्यास जे प्रसंग घडले ते भविष्यात पुन्हा घडू नयेत अशी उपाययोजना आपण करायला हवी. आता राज्यपालांनीही सी. व्ही. आनंदा बोस यांनी आयोजकांवर प्रखर टीका केली आणि ते म्हणाले की अत्यंत निष्ठूरपणे आयोजकांनी लियोनेल मेसीची गोट इंडिया टूर आयोजित केली आणि फुटबॉल प्रेमींच्या भावनांकडे दुर्लक्ष केले. आयोजकांनी या प्रकरणी केवळ आपल्या तुंबड्या भरून घेण्याकडे लक्ष दिले आणि त्यात प्रेक्षकांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या भावनांचा खेळ केल्याचा आरोप केला जात आहे.
आपल्याकडे परदेशी खेळाडू आणि अभिनेत्यांचे आकर्षण आहे आणि याचेच प्रत्यंतर आले. त्यामुळे अनेक मंत्री, खासदार आणि आमदारांनी मेसीला पाहण्यासाठी गर्दी केली होती. हजारो लोक मेसीला पाहण्यासाठी आले होते पण त्याची झलकही पाहू शकले नाही. काही प्रेक्षकांनी हा गैरव्यवहार असल्याचा आरोप केला. सुरक्षा व्यवस्थेचे या सर्व प्रकारात तीनतेरा वाजलेच. लियोनेल मेसीच्या आगमनाने फुटबॉल प्रेमी आनंदित झाले होते पण त्यांना निराशाच पदरी आली. आता बऱ्याच फुटबॉल प्रेमींनी विश्वासघात झाल्याचे जाणवते अशी प्रतिक्रिया दिली आहे आणि ती योग्य आहे. कारण या गोंधळाला जबाबदार सर्वस्वी आयोजकांचे गैरव्यवस्थापन आणि सावळागोंधळ होता. मेसीच्या कार्यक्रमाला साल्ट लेक स्टेडिमवर ८० हजार लोक जमले होते. त्यांनी गैरव्यवस्थापनामुळे तोडफोड केली. कोलकाता म्हणजे सिटी ऑफ जॉय म्हटले जाते, पण ८० हजार प्रेक्षकांसाठी सिटी ऑफ डिसॅस्टर ठरले. फुटबॉल चाहत्यांसाठी ही सायंकाळ म्हणजे मोडतोडीचा कार्यक्रम ठरला. साल्ट लेक स्टेडियमवरील आसनव्यवस्था मोडीत काढण्यात आली. चाहत्यांचा अमूल्य वेळ आणि अफाट पैसा यात वाया गेला आणि त्याची आयोजकांना ना खंत ना खेद. त्यामुळे असे प्रकार होऊ नयेत असे वाटत असेल तर आयोजकांनी अतिदक्षता घेतली पाहिजे. बहिष्कार हा उपाय नाही पण लोकांनीही अशा कार्यक्रमांना जाण्यापूर्वी हजारवेळा विचार केला पाहिजे. मेसीचे दर्शन दुर्मीळ पण जेव्हा घडतो तो प्रसंग आयुष्यातला यादगार प्रसंग बनला पाहिजे. मेसी मानिया हे सांगतो, की कोलकात्यात मेसीचे दर्शन ज्यांना घडले नाही, त्यांना पैसे मोजूनही काहीच पदरी पडले नाही. कोलकात्यातील लोक निश्चितच असे कमनशिबी नाहीत.

# मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कारासाठी ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांची निवड

## लातुरात २१ डिसेंबर रोजी वितरण समारंभ



**लातूर/प्रतिनिधी :** पुरोगामी व क्रांतीकारी समाजवादी नेते मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार यंदा सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना प्रदान केला जाणार आहे. माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल ही घोषणा केली. पुरस्कार वितरण समारंभ लातूर येथे रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. तसेच या समारंभात प्रशांत भूषण भारतीय लोकशाही समोरील आव्हाने या विषयावर व्याख्यान देतील.

मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज हंडियाचे संयोजक व भारत ओडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

प्रशांत भूषण हे भारतातील सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता, लेखक, सामाजिक आणि जनहित याचिका (पीआयएल) लढवणारे प्रसिद्ध व सार्वजनिक हिताचे वकील आहेत. ते भ्रष्टाचार, राजकीय आणि प्रशासकीय दुरुपयोग, पर्यावरणीय समस्या आणि नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्यांचा कायदेशीर आवाज म्हणून ओळखले जातात. ते भारत विरोधी भ्रष्टाचार चळवळीतील मुख्य सदस्य होते आणि अण्णा हजारे यांच्या जन लोकपाल विधेयक चळवळीसाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर त्यांनी आम आदमी पार्टी चा आधार घेतला पण नंतर त्यांनी पक्षाचा मार्ग आणि निर्णय यावर टीका केली. प्रशांत भूषण हे 'न्यायालयाची पारदर्शकता वाढवावी' अशी त्यांची भूमिका ते जोरात मांडत आहेत आणि लोकशाहींमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य व नागरिक अधिकार यांचे संरक्षण महत्त्वाचे आहे, यावर त्यांचा नेहमीच भर राहिला आहे.

लातुरचे वैचारिक नेतृत्व केलेले ॲडव्होकेट मनोहरराव गोमारे यांचे २० डिसेंबर २०२३ रोजी निधन झाले. ते महाराष्ट्राचे पुरोगामी, क्रांतिकारी आणि समाजवादी नेते होते. थोर समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी राजकारण सुरू केले. ते शेवटच्या दिवसापर्यंत पुरोगामी, क्रांतिकारी विचारसरणीत राहिले. ते लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते. त्यांनी सामान्य लोकांच्या सामाजिक प्रश्नांसाठी आंदोलन करून लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. एस. टी. चळवळीदरम्यान त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला होता. देशात आणीबाणी लागू झाली तेव्हा त्यांना अटक करून १९ महिने नाशिक तुरुंगात ठेवण्यात आले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ते शेवटपर्यंत पदाधिकारी होते. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेसाठी पाच वेळा आणि खासदारपदासाठी दोनदा निवडणूक लढवली आहे. ते एक संघर्षशील कार्यकर्ते होते.

माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल एकमताने ॲड. प्रशांत भूषण यांची निवड केली. निवड समितीमध्ये सर्वश्री प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, माधव बावगे प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, शिवाजी शिंदे, उदय गवारे, सूर्यकांत वैद्य, डॉ. बी. आर. पाटील दिलीप आरळीकर, श्याम जैन, डॉ. कोमल गोमारे, ॲड. विश्वास मोमले, डॉ. गणेश गोमारे यांचा समावेश आहे.

## तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्याच्या उद्देशाने तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशन, धाराशिवच्या वतीने नुकतेच लातूर तालुक्यातील चिंचोलीराव वाडी येथील महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी चिंचोलीराव वाडीचे सरपंच दत्ता फुलचंद सप्ताळ , उपसरपंच अनुसया व्यंकट पिंपरे , ग्रामविकास अधिकारी आर.के. मठपती, अरविंद दिवशे , तांबोळी मॅडम, प्रतिभा मॅडम फाऊंडेशनचे अध्यक्ष मदन कावळे, राघव गडकर, जिल्हा समन्वयक कल्याणी हाके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील महिलांना सक्षम करण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांनाही लॅपटॉपसह अन्य आवश्यक साहित्य अल्पदरात वितरित केले जाणार आहे. त्यासाठीही संस्थेच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न आणि सहकार्य केले जात आहे. ही संस्था महिला सबलीकरण, आरोग्य, कृषी, पर्यावरण या विषयावही अग्रक्रमाने काम करते. संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती मदन कावळे यांनी दिली. या उपक्रमाबद्दल बोलताना सरपंच दत्ता सप्ताळ यांनी समाधान व्यक्त करून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम करणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

## आविष्कार स्पर्धेत शिवलिंगेश्वर फार्मसीचे घवघवीत यश .



लातूर/प्रतिनिधी : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार २०२५-२०२६ या स्पर्धेत श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला, ता. औसा, जि. लातूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी एकूण पाच पारितोषिके पटकावत महाविद्यालयासह विद्यापीठाचेही नाव उज्वल केले.

ही स्पर्धा विद्यापीठातील स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस, नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती. विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदवलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या यू.जी. आणि पी.जी.गटातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. पारितोषिक विजेते यू.जी. गट- हुमॅनीटीज, लॅग्वेज अॅण्ड फाईन आर्ट: काबरा विनय (फार्म-डी अंतीम वर्ष) द्वितीय पारितोषिक, पी. जी. गट-कॉमर्स, मॅनेजमेंट अॅण्ड लॉ : आकांक्षा जाधव (फार्म-डी अंतीम वर्ष) द्वितीय पारितोषिक, वैभव गबाळे (फार्म-डी पाचवे वर्ष) तृतीय पारितोषिक, यु.जी. गट- अतिका पठाण : (बी. फार्म अंतीम वर्ष) तृतीय पारितोषिक, पी.जी. गट- इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी: खुल्लोड कुरेशी (फार्म-डी पाचवे वर्ष) द्वितीय पारितोषिक. स्पर्धेतील सर्व विजेते विद्यार्थी आता राज्य स्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. संघव्यवस्थापक व मार्गदर्शक म्हणून येलम विद्या (कापसे), यांनी काम पहिले असून, विजेत्या विद्यार्थ्यांना कविता सिरगीरे, डॉ. अशोक गिरी, डॉ. प्रसाद कटारे, डॉ. सचिन कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला या संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी सर्व विजेते विद्यार्थी आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# लघुपटासारख्या कलाकृतींमधून प्रबोधन महत्वाचे : अमोल तांबे

## दयानंद सभागृहात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** लघुपटासारख्या कलाकृतींमधून होणारे समाज प्रबोधन अतिशय महत्वाचे असल्याचे प्रतिपादन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्था व अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलच्या उद्घाटनप्रसंगी लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी, सचिव रमेश बियाणी, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड तसेच दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मानिकर, कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. आदित्य सोनवणे (हॉटेल कन्हैया), दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना अमोल तांबे म्हणाले की, पूर्वी फिल्मनिर्मिती ही काही मोजक्या कुटुंबापुरती मर्यादित होती; मात्र आज प्रत्येकाला संधी उपलब्ध आहे. समाजातील छोट्या-छोट्या विषयांवर आधारित फिल्म्समधून जनजागृती व समाजप्रबोधन करता येते. विविध गुन्हेगारी घटनांवर आधारित चित्रपट तयार केल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांचे स्वागत कार्यक्रमाचे प्रायोजक आदित्य सोनवणे यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमनजी लाहोटी यांचे स्वागत अभिजात फिल्म सोसायटीचे उपाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी, तर सचिव रमेश बियाणी यांचे स्वागत दयानंद कला महाविद्यालयाच्या ॲनिमेशन विभाग प्रमुख व अभिजात फिल्म सोसायटी समिती सदस्य डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले. या फिल्म फेस्टिवलमध्ये १२ वेगवेगळ्या देशांतून २५० शॉर्ट फिल्म्स दाखल झाल्या असून त्यामध्ये शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, व्हिडिओ साँग व



ॲनिमेशन अशा प्रकारांचा समावेश आहे. त्यापैकी निवडक १०० फिल्म्स तीन दिवसांत प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या फिल्म्सचे परीक्षण जागतिक दर्जाच्या परीक्षकांमार्फत करण्यात आले असून यामध्ये सुप्रसिद्ध फिल्म दिग्दर्शक संतोष पठारे व फिल्म निर्देशक नीलेश कुंजीर यांचा समावेश आहे. निवड झालेल्या उत्कृष्ट फिल्म्सना फेस्टिवलच्या शेवटच्या दिवशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या फेस्टिवलमध्ये स्थानिक आठ फिल्ममेकरांनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. विश्वास शेंबेकर यांनी अभिजात फिल्म सोसायटीची माहिती देत फिल्म फेस्टिवल आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. पुणे व मुंबईप्रमाणे लातूरमध्येही फिल्म फेस्टिवलचे वातावरण निर्माण करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी फेस्टिवलसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार अभिजात फिल्म सोसायटीचे सचिव डॉ. स्वप्निल देशमुख यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वप्निल देशमुख, धनंजय कुलकर्णी, डॉ. दुर्गा शर्मा, आदित्य कुलकर्णी, प्रथमेश जाधव, अभिषेक बुचके व डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांनी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दयानंद कला महाविद्यालयातील ॲनिमेशन विभागातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून मोलाची भूमिका बजावली.

# उत्कृष्ट वित्तीय कामगिरीबद्दल महापारेषणचा गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने योग्य आर्थिक व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सुधारणा प्रक्रियेच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पॉवरलाईन ट्रान्सटेक इंडियाच्या वतीने ''उत्कृष्ट वित्तीय कामगिरीपश्चिम विभाग'' हा मानाचा पुरस्कार महापारेषणला प्रदान करण्यात आला.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या कुशल नेतृत्वाखाली संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त विभागाचे महाव्यवस्थापक श्री. राजेश पवार, श्रीमती सीमा डुबेवार, श्रीमती आरती रामटेके यांच्यासह त्यांच्या टीमने




उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कंपनीच्या वित्तीय शिस्तीचा, कार्यक्षम व्यवस्थापनाचा आणि पारदर्शकतेचा हा सन्मान आहे. महापारेषणच्या क्रेडिट रेटिंगमध्ये नुकतीच झालेली लक्षणीय सुधारणा, आर्थिक नियोजनातील काटेकोरपणा आणि कार्यपध्दतीतील सुधारणांमुळे कंपनीने उल्लेखनीय यश मिळविले आहे.

सुयोग्य वित्त कार्यपध्दती, गुंतवणूक व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या क्षेत्रांत महापारेषणने सकारात्मक व भक्कम कामगिरी केली आहे. हा गौरव कंपनीसाठी अभिमानास्पद असून भविष्यातही महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अशीच उत्कृष्ट कामगिरी करत ऊर्जा क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित करेल, असा विश्वास महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना महापालिकेत संधी देणार - ना. बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी केले. ते शहरातील द सिलेब्रेट रिसॉर्ट येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या महानगरपालिकेच्या आढावा बैठकीत बोलत होते. .

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ. संजय बनसोडे,आ. विक्रम काळे, मुर्तूजा खान,व्यंकट बेद्रे, बबन भोसले, इब्राहिम सय्यद, मकरंद सावे, प्रशांत पाटील, प्रणिता सूर्यवंशी, विक्रांत गोजमगुंडे, चंद्रकांत बिराजदार, सुरेखा पाटील, विशाल आवडे,अंकुश नाडे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ना. पाटील म्हणाले की, आपण लातूर महानगरपालिकेची निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असून कार्यकर्त्यांनी घाबरू नये. लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण निवडणुकीला सामोरे जाणार असून कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घराघरापर्यंत जाऊन राष्ट्रवादीचा प्रचार करावा असे आवाहनही सहकार मंत्री ना. पाटील यांनी केले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Invitation for Bids on e-Tendering Basis**

Tenders in e-tendering format are invited vide **Tender Nos: EE/TJR/TS/T-04/2025-26, EE/TJR/TS/T-05/2025-26, EE/TJR/TS/T-06/2025-26** for Work of monthly meter reading of 3-Phase LT Consumers having Load Above & Below 27 HP (20 KW) through MRI/Manual under O&M Sub-Division, Naldurg/Omerga/Tuljapur respectively under O & M Division, Tuljapur.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | Tender Amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | EE/TJR/TS/ T-04/2025-26<br>EE/TJR/TS/ T-05/2025-26<br>EE/TJR/TS/ T-06/2025-26 | Work of monthly meter reading of 3-Phase LT Consumers having Load Above & Below 27 HP (20 KW) through MRI / Manual under O & M Sub-Division, Naldurg/Omerga/ Tuljapur under O & M Division, Tuljapur. | Rs. 10.00 Lakh (Excluding GST) Each tender amt. |

Details of Tender Term & condition is available on MSEDCL's Web Site **http://works.mahadiscom.in/eTender/etender.** The Employer reserves the right to accept any bid, or reject any or all bids, without assigning any reason therefore and without thereby incurring any liability to the Bidder or Bidders.

**Sd/- Executive Engineer**
**PRO No: LTR No. 149 Dt.16/12/2025** **MSEDCL Division Office, Tuljapur**

# मुक्त विद्यापीठाच्या सहा विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग



**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा विद्यार्थ्यांनी राष्ट्रकुल संसदीय मंडळ अभ्यासवर्गात सक्रिय सहभाग घेतला. नागपूर येथे नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान दिनांक ०८ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत हा अभ्यासवर्ग संपन्न झाला.

लोकप्रशासन आणि राज्यशास्त्र विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संसदीय शासन प्रणाली आणि विधिमंडळ कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने सन १९६४ पासून राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा विधान भवन (मुंबई) यांच्यातर्फे दरवर्षी या अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या या अभ्यासवर्गाचे उद्घाटन राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधासभा उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सदर अभ्यासवर्गात संसदीय आयुधे, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे महत्व आणि भूमिका, लोकशाही प्रणाली, कायदे निर्मिती प्रक्रिया, विधिमंडळ भूमिका, प्रसारमाध्यमे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद, तेथील विविध शासकीय समित्या, ग्रंथालय यांची पाहणी करत प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळाली. अभ्यासवर्गाचा समारोप केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री आ. श्री. नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या सहा दिवसीय अभ्यासवर्गासाठी राज्यातील १२ विद्यापीठांचे जवळपास ७२ विद्यार्थी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# राष्ट्रीय लोक अदालतीत जिल्ह्यात हजारो प्रकरणे तडजोडीने निकाली

धाराशिव दि.१५ डिसेंबर (जिमाका) राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या निर्देशानुसार दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. धाराशिव येथे सकाळी ठीक १०.३० वाजता प्रत्यक्ष लोक अदालतीच्या कामकाजास सुरुवात झाली.

या वेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी अध्यक्ष तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.ए.एस.आवटे,श्री.एस. जी.दुबे (जिल्हा न्यायाधीश-४), श्री. आर.के.खोमणे (जिल्हा न्यायाधीश-५) श्री.अमोल वरुडकर (अध्यक्ष,जिल्हा विधीज्ञ मंडळ),श्री. एम.बी. देशमुख (जिल्हा शासकीय अभियोक्ता),श्रीमती बी.के.पाटील (सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) तसेच इतर न्यायाधीश उपस्थित होते.या लोक अदालतीसाठी एकूण ९ पॅनल ठेवण्यात आले होते.

१३ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील लोक अदालतीमध्ये एकूण ५५ हजार ४२७ प्रलंबित व दावापूर्व १२ हजार ३८० प्रकरणे सामोपचाराने मिटविण्यासाठी ठेवण्यात आली होती.त्यापैकी प्रलंबित एकूण ७५३ व दावापूर्व एकूण ३,५७७ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली आहे.

लोक अदालतीमध्ये धनादेश प्रकरणांमध्ये फिर्यादी पक्षाला रुपये १ कोटी १० लक्ष २७ हजार ९७७ रुपये इतकी वसुली झाली.प्रलंबित दिवाणी स्वरूपाच्या प्रकरणांतून १ कोटी ६२ लक्ष २१ हजार ६९० रुपये इतकी रक्कम वसूल झाली.बँकेच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये रुपये १ कोटी १३ लक्ष ४३ हजार ३२० रुपये तर बँकेच्या वादपूर्व प्रकरणांमध्ये रुपये ९५ लक्ष ८३ हजार ५७० रुपये इतकी वसुली झाली.

तसेच नगरपालिक व ग्रामपंचायतीच्या पाणीपट्टी व घरपट्टीच्या प्रकरणांमधून रुपये ८७ लक्ष ७६ हजार ६१८ हजार इतकी वसुली झाली.ग्राहक मंचाच्या प्रकरणांमध्ये रुपये १५ लक्ष इतकी रक्कम वसूल झाली,तर गुन्हा कबुलीच्या प्रकरणांमध्ये रुपये ३ लाख ९२ हजार इतका दंड वसूल करण्यात आला.

# डॉक्टरांनी ट्रॅक्टरमधून प्रवास केल्याच्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून निर्वाळा

धाराशिव (जिमाका- तालुक्यातील केशेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत सुरू असलेल्या (NQAS) अर्थात नॅशनल क्वालिटी अॅश्युरन्स स्टँडर्ड मानांकन तपासणीसाठी नागपूरहून डॉक्टरांचे एक पथक जिल्ह्यात आले होते.या पथकात नागपूर येथील उपजिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत कापसे तसेच कोल्हापूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनील करुंदवाडे यांचा समावेश होता.

आरोग्य विभागाचा कारभार अधिक सुधारण्यासाठी केंद्र सरकारकडून 'कायकल्प' तसेच 'एनक्यूएएस (NQAS)' अशा विविध तपासण्या केल्या जातात.मात्र,जिल्ह्यातील केशेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांच्या पथकाने चक्क 'ट्रॅक्टर'मधून नागपूरला प्रवास केल्याचे बिल सादर केल्याबाबतचे जाहिर झाले होते.

या संदर्भात सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी चौकशी केली असता कोणताही वैद्यकीय अधिकारी अथवा अधिकारी शासकीय संस्थेच्या तपासणीसाठी भेट देत असताना खाजगी वाहनाचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले.त्यानुसार संबंधित पथकासाठी खाजगी वाहनाचा वापर करण्यात आला होता. प्राथमिक आरोग्य केंद्र,केशेगाव येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सादर करण्यात आलेले खाजगी वाहनाचे बिल तपासणीअंती योग्य व बरोबर असल्याचे आढळून आले आहे.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, केशेगाव येथे आलेल्या पथकाने (NQAS) अर्थात नॅशनल क्वालिटी अॅश्युरन्स स्टँडर्ड मानांकन तपासणी केली असून,(NQAS) मानांकनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र,केशेगावची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी दिली आहे.

# सुरक्षा समितीच्या बैठकीत मेट्रान सुमित्रा गोरे व नवनाथ सरवदे यांचा सत्कार



धाराशिव(प्रतिनिधी)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव सुरक्षा समितीची बैठक संपन्न झाली,बैठकीपुर्वी समितीच्या वतीने रुग्णालयातील विभागात पाहणी करण्यात आली, स्वच्छता,सुरक्षा रक्षक,हॉटेल,ओपिडी व इतर ठिकाणी पाहणी केली असता संबंधितांना सुचना देण्यात आल्या, पाठीमागील बैठकीतील इतिवृत्ताचे स्मरण करुन अन्य विषयांवर चर्चा करण्यात आली.तसेच मेट्रान सुमित्रा गोरे यांना सोलापूर येथील सोनुबाई आवटे सेवानिवृत्त अधिसेविका व करुणाशिल बहुउद्देशीय सामाजिक संस्था व करुणाशिल समिती सोलापुरच्या वतीने राज्यस्तरीय करुणाशिल पुरस्कार देण्यात आला,

तर सामाजिक कार्यकर्ते नवनाथ सरवदे यांनी दोन महिन्यापासून रुग्णालयात उपचार घेणाऱ्या निराधार महिलेची काळजी घेतली व सामाजिक कार्यकर्त्या आशाताई कांबळे यांच्या माध्यमातून मातोश्री वृद्धाश्रम धाराशिव येथे सोय केली या मानवहिताच्या कार्यासाठी त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा वैद्यकशास्त्र डॉ.विश्वजीत पवार,सचिव तथा वैद्यकीय अधिक्षक डॉ.तानाजी लाकाळ,सदस्य अब्दुल लतीफ, सदस्य गणेश वाघमारे, आरोग्य मित्र रौफ शेख,पोलीस निरीक्षक नजिरोद्दीन नाईकवाडी, सुनिल जोगदंड,बाळासाहेब जावळे, मेट्रान सुमित्रा गोरे,मेट्रान ढोणे मॅडम, विद्दुलता पांचाळ, समाज सेवा (वैद्यकीय) अधिक्षक नवनाथ सरवदे,महेश गोपाल अटकळ,मुरकुटे,बांधकाम विभाग शशीकांत अंकुशे,सह इतर उपस्थित होते.

# १८ डिसेंबरला अल्पसंख्यांक हक्क दिवसानिमित्त कार्यक्रम

धाराशिव (जिमाका) दि.१६ डिसेंबर :अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांची संस्कृती,भाषा,धर्म व परंपरा इत्यादीचे संवर्धन करता यावे यासाठी दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.या दिवसाचे औचित्य साधून जिल्हा नियोजन समिती धाराशिव यांच्याकडून १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती कार्यालय धाराशिव येथे अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत आयोजित कार्यक्रमातून जाणीव जागृती करण्यात येणार आहे.

तरी अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे.असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे यांनी केले आहे.

# एनव्हीपी शुगरच्या वतीने चौथ्या पंधरवाड्यात गाळपास आलेल्या ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा

## चेअरमन नानासाहेब पाटील यांनी द्वितीय हंगामातही ऊसबिल देण्याचा शब्द पाळला




धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि.च्या वतीने सन २०२५- २०२६ च्या द्वितीय गळीत हंगामात १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत गाळपासाठी आलेल्या ऊसाचे बिल (दि.१६) संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली आहे.

एनव्हीपी शुगर कारखान्याचे हित डोळ्यासमोर ठेवून पंधरवाडा पूर्ण होताच संबंधित शेतकर्यांच्या बँक खात्यात ऊसबिल जमा करण्यात आले. विशेष म्हणजे तिसर्या पंधरवाड्यात म्हणजे नोव्हेंबर महिन्यात कारखान्यात उत्पादित झालेल्या १ लाख जागरी पावडर पोत्यांचे पूजनही कारखान्याच्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आले होते. यंदाच्या हंगामात ऑक्टोंबर महिन्यात कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाल्यापासून चाचणी गळीत हंगामाप्रमाणेच यंदाच्या गळीत हंगामातही पंधरा दिवसांत शेतकऱ्याना ऊसबिल देण्याची परंपरा कायम जोपासली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.



ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिलेले आहे त्यांनी बँकेत जावून आपले बिल घ्यावे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्याप बँक खाते दिलेले नाही, त्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. धाराशिव बँकेत ऊसाचे बिल घेवून जावे, असे एनव्हीपी शुगरचे चेअरमन नानासाहेब पाटील यांनी कळविले आहे.

# तालमवाडी शिवारातून २३ शेळ्या, एक बोकड व ५ शेळयाच्या पिल्ल्याची चोरी: गुन्हा दाखल

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आलम साहेबलाल पटेल, वय ४८ वर्षे, रा.तामलवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे तामलवाडी शिवारातील शेतातील शेडचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१३.१२.२०२५ रोजी २०.३० ते दि. १४.१२.२०२५ रोजी ०५.०० वा. सु. तोडून आत प्रवेश करुन शेडमधील २३ शेळ्या एक बोकड व ५ शेळ्याची पिल्ले एकुण १,४५,००० किंमतीच्या चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आलम पटेल यांनी दि.१५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४ (१),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# महाविस्तार अॅपची माहिती कृषी विभागाने दिली




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- कृषी महाविद्यालयात 'महाविस्तार' पवर मार्गदर्शनपर व्याख्यान - धाराशिव - व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास कृषी महाविद्यालय आणि जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविस्तार या नव्या एआय-आधारित अॅप संदर्भात मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी महेश देवकते हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित शेतकरी बांधवांना कृषी विभागाने विकसित केलेल्या महाविस्तार अॅपची सविस्तर माहिती दिली. या अॅपमध्ये हवामान अंदाज, पिकांसाठी आवश्यक खतांचे प्रमाण, कीड व रोग व्यवस्थापन, बाजारभाव यांसह विविध शेतीविषयक सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.महाविस्तार अॅप हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असून, शेतकऱ्यांसाठी मराठी भाषेतील चॅटबोटची सुविधा देण्यात आली आहे. या चॅटबोटच्या माध्यमातून शेतकरी थेट प्रश्न विचारू शकतात, त्यामुळे शेतीकामात मोठी मदत होणार आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी एआय तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. तसेच या पद्वारे गोदाम व्यवस्था, डीबीटीवरील योजना आणि विविध शासकीय सुविधांची माहिती शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे सांगितले.अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी महाविस्तार पचे कौतुक करताना, या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. अमित गांधले, महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा.हरी घाडगे,कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी सुषमा काळे, पीएम किसान ऑपरेटर अभिमन्यू हिप्परकर, सांख्यिकी ऑपरेटर सागर एडवे, तंटामुक्त अध्यक्ष श्यामसुंदर लावंड तसेच प्रगतशील शेतकरी बाळासाहेब वीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. व्ही. भालेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मोहसीन शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**ई-निविदा सुचना क्र. सन १०/ २०२५-२०२६**

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद धाराशिव**

या विभागांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या योजने अंतर्गत मौ. वाघाली व उपळा ता. धाराशिव या कामांची ६ वी मागणी ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १६/१२/२०२५ ते १९/१२/२०२५ या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात आले आहे. सर्व संबंधीत निवीदाधारकांनी वरील संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन सादर करावी.

स्वाक्षरीत/-
(सुनिल सु. कटकधोंड)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद धाराशिव

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649